# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय- **अमुल बनसोड** | ३ |
| २) | येशूने स्थापलेली मंडळी-**जे.सी.चोट** | ५ |
| ३) | देवापासून जन्म पावल्याची लक्षणे **-जेरी बेट्स** | १३ |
| ४) | दहा आज्ञा-**विलियम वुडसन** | १८ |
| ५) | परमेश्वराचा न्याय **-वेयन बॅरियर** | २१ |
| ६) | एकतेसाठी एक विनंती - **जे.सी.चोट** | २३ |
| ७) | पवित्रशास्त्र वाचणे - **चार्ल्स स्कॉट** | २६ |
| ८) | ह्याचा काय अर्थ आहे की स्त्री "बालकाला जन्म देण्याच्या योगे तारण पावेल" - **बेट्टी बर्टन चोट** | २८ |
| ९) | आम्हा पूर्ण सत्य दे - **कैरोल साइटस** | ३२ |
| १०) | शांती **-जॅक डब्ल्यू कार्टर** | ३४ |
| ११) | बाप्तिस्मा - एक प्रारंभ **-जिमि जीविडेन** | ३७ |

१२) सर्वांकरीता परमेश्वराची कृपा - **माईकल एल. किंग** ३९

१३) ख्रिस्ती बनल्यानंतर -**रॉड्स फ्रेड्रिक** ४३

१४) मला सुवार्तेची लाज वाटत नाही - **फ्रान्सिस डेविड** ४८


१५) उपासनेचा अर्थ - **जॉन ओ'नील** ५३

१६) सर्वकाही प्रभूच्या नावात करा - **डेविड एंगुईश** ५८

१७) शांती तर शांती देण्यानेच मिळेल - **टॉम हॉलँड** ६४

१८) तुम्ही येशूबरोबर काय कराल ? - **सनी डेविड** ६६

ooo



## संपादकीय...

# देवाचा विवाहासंबंधी नमुना

**अमुल बनसोड**

देवाने मोशेच्याद्वारे उत्पत्ती २:२४ मध्ये म्हटले, ''यास्तव पुरुष आपल्या आईबापास सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील.'' पवित्रशास्त्रामधील हा भाग विवाहसंबंधी मुख्य पाया आहे. हे वचन अगदी बरोबर का? कारण देवाने स्वत: आदाम आणि हवेचा एदेन बागेमध्ये पहिला लग्नविधी लावला. अनेक परिवार स्वत:ला बिकट परिस्थित पाहत आहेत. उत्पत्ती २:२४ आम्हाला विवाहासंबंधी पुष्कळ सत्य शिकविते की जे आम्हाला शिकणे आवश्यक आहे.

विवाह हा भिन्नलिंगी म्हणजे एक पुरुष व एका स्त्रीमध्ये झालेला असावा हे आपण शिकलो. काही वर्षापूर्वी ह्यासंबंधी इतके जास्त बोलले जात नव्हते पण समलैगिंक विवाह आणि बहुविवाह यांचे आजच्या काळात समर्थन केल्या जात आहे. म्हणून यावर जोर देणे आवश्यक आहे की ह्या गोष्टी देवाच्या घरासंबंधी असलेल्या नमुन्याविरुद्ध आहेत. देवाने विवाहाची रचना कायमस्वरूपी केली आहे, ते असे की, पुरुष स्त्रीसोबत जोडल्या जाईल. जोपर्यंत तो जिवंत राहील. येशू ख्रिस्ताने ह्या मुद्दयावर विधान करताना म्हटले की,


"ह्यामुळे ती पुढे दोन नव्हे तर एकदेह अशी आहेत म्हणून देवाने जे जोडले आहे ते माणसाने तोडू नये"(मत्तय१९:६). जेव्हा अनेक विवाह सुटपत्रामध्ये नष्ट होत आहेत तेव्हा हा धडा आम्हाला अत्यंत कळकळीने शिकणे गरजेचे आहे. शेवटी विवाह हा अशांसाठी आहे की जे परिपक्व आहेत आणि मातापित्याला सोडून स्वत:चे घर तयार करण्यास लायक आहेत. अनेक विवाह अपयशी ठरतात. कारण त्यातील एक किंवा दोघेही जोडीदार एकमेकांबाबत इतके अपरिपक्व आणि स्वार्थी असतात की ते एकदेह (एक व्यक्ती) प्रत्येक दृष्टीने वचनाप्रमाणे बनू शकत नाहीत. चला आपण सर्व आपले गृह ख्रिस्ती गृह बनण्यासाठी विवाहासंबंधी असलेला देवाचा नमुन्याला मान्यता देण्यास प्रयत्नाची पराकाष्ठा करूया.

ooo

उत्पत्ती २:२४ मध्ये म्हटले,
''यास्तव पुरुष आपल्या
आईबापास सोडून आपल्या
स्त्रीशी जडून राहील; ती दोघे
एकदेह होतील.''

# येशूने स्थापलेली मंडळी

**जे.सी.चोट**



येशूने ज्या मंडळीची स्थापना केली त्याविषयी त्याने सर्वात प्रथम त्या समयी म्हटले होते की, जेव्हा पेत्राने त्याच्या प्रश्नाचे उत्तर देतांना मत्तय १६:१५-२० या मध्ये असे म्हटले, "तू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस." ख्रिस्त ज्याला आपल्या पापा करिता वधस्तंभावर खिळिले, ज्याला पुरले आणि जो पुन्हा उठला तो असा खडक आहे ज्यावर मंडळीची निर्मिती झाली आहे. (मत्तय १६:१८) १ करिंथकरास पत्र ३:११ या वचनात आपण वाचतो की, "येशू ख्रिस्त हा जो घातलेला पाया त्याच्या वाचून दुसरा पाया कोणाला घालता येत नाही."

ज्या मंडळीची निर्मिती येशूने केली त्यास "येशूचे शरीर" (कलस्सै १: १४), (इफिस १:२२-२३) आणि "ख्रिस्ताची मंडळी"

असेही म्हटले आहे. (रोमकरास पत्र १६:१६) ख्रिस्ताने केवळ एकाच मंडळीची स्थापना केली. इफिस ४:४-६ मध्ये लिहिले आहे की, "एकच शरीर आणि एकच आत्मा, ज्याप्रमाणे तुमच्या बोलावण्याच्या एका आशेत तुम्ही बोलावलेले आहा. एक प्रभु, एक विश्वास, एक बाप्तिस्मा, एक देव, सर्वांचा एक बाप, तो सर्वांवर आणि सर्वांमधून आणि सर्वांमध्ये आहे."

आज आपणांमध्ये जितके पंथ दिसून येतात ते सर्व मनुष्यांच्या विविध कृतींवर आधारित धर्मोपदेशाच्या शिकवणुकीचा परिणाम आहे. पवित्र शास्त्रांत मंडळीला ख्रिस्ताच्या नावाशिवाय इतर अन्य कोणत्याही मानवी नावाने संबोधिलेले नाही. कारण पवित्र शास्त्रात प्रेषितांची कृत्ये ४ : १२ मध्ये म्हटले आहे की, "आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही."

प्रारंभीच मंडळीच्या सदस्यांना खोट्या शिकवणीपासून सावध राहण्यास सांगितले गेले होते.

इफिस येथील मंडळीच्या अध्यक्षांना बोलावून एके ठिकाणी प्रेषित पौल त्यांना म्हणतो की, "तुम्ही स्वत:कडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेविले त्या सर्वांकडे लक्ष द्या. ह्यासाठी की, "देवाची जी मंडळी" त्याने आपल्या रक्ताने "स्वत:करिता मिळविली" तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हांमध्ये शिरतील, हे मी जाणून आहे. तुम्हांपैकीही काही माणसे उठून शिष्यांना आपल्या मागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील. ह्यास्तव मी तीन वर्षे रात्रंदिवस अश्रू गाळीत प्रत्येकास बोध करण्यात खंड पडू दिला नाही ही आठवण ठेवून सावध रहा." (प्रेषित २० : २८ -३१)

ज्या मंडळीची येशूने स्थापना केली ती पवित्र शास्त्राच्या अनुसार आहे. तिचे नाव पवित्र शास्त्राच्या शिक्षणावर आधारित आहे. अर्थात ते मानवाकडून बनविलेले नाही. परंतु मनुष्यांनी बनविलेली नावे कशी

प्रचारात आली ? काही नावाचा उपयोग एखाद्या मंडळीच्या संस्थापकास सन्मानित करण्यासाठी केला गेला. उदा. "लूथरन" त्याचप्रमाणे काही नावाचा उपयोग एखाद्या शिक्षणाचे महत्व पटवून देण्याच्या दृष्टीने केला गेला. उदा. '(बॅप्टिस्ट)", काही नावाचा उपयोग एखाद्या विशिष्ट रीतीला महत्त्व देण्यासाठी करण्यात आला. उदा. "(पेन्टेकॉस्टल)" अशाच प्रकारे एखादे नाव प्रिसबिट्रच्या कामास महत्त्व देण्याच्या दृष्टीने दिले गेले. उदा. "(प्रिसबटेरियन)" परंतु अशा प्रकारची सर्व नावे ज्या, आदर, स्तुती व महिमेस केवळ येशूख्रिस्त पात्र आहे त्यास येशू पासूनदूर करतात.

मनुष्याकडून दिली गेलेली ही नावे अनेक कारणामुळे अयोग्य आहेत. सर्वात प्रथम ही नावे फूट पाडतात व लोकांमध्ये भेद निर्माण करतात. ही सर्व नावे येशूच्या त्या प्रार्थनेचा स्पष्ट विरोध करतात, ज्या बाबतीत आम्ही योहान १७ या अध्यायात वाचतो की, येशूने परमेश्वराजवळ प्रार्थना करताना म्हटले की, आम्ही सर्वांनी एक व्हावे, दुसरे कारण १ ले करिंथ १:१०-१३ मध्ये आपणास स्पष्ट आढळले की, अशा सर्व नावांना पवित्र शास्त्राने अनुचित व हानिकारक असे ठरविले आहे.

"बंधुजनहो, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने मी तुम्हास विनंती करतो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे, म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत, तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे. कारण माझ्या बंधूनो, तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच्या माणसांकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकजण मी पौलाचा, मी अपुल्लोसाचा, मी केफाचा आणि मी ख्रिस्ताचा आहे असे म्हणतो ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय? पौलाला तुम्हांसाठी वधस्तंभावर खिळिले होते काय? पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला होता काय ?" तिसरे कारण, ज्या स्थानी येशूचे नाव घेणेच उचित आहे तेथे मनुष्याचे नाव घेतले जाते. यापूर्वी पहिल्याप्रमाणेच प्रेषित ४ : १२ मध्ये पवित्र शास्त्र

आपणास शिकविते की, "आणि तारण दुसऱ्या कोणाकडूनही नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही" चौथे कारण, मनुष्यांनी दिलेल्या या नावामुळे घोटाळे निर्माण होतात. त्यामुळे अविश्वासास प्रोत्साहन मिळते. जे लोक अशा प्रकारच्या नावाने ओळखे जातात आणि जे अशा नावामुळे प्रभू येशूपासून दूर गेले आहेत ते सर्व याच कारणांनी नाश पावतील. या करिता मनुष्यांनी दिलेली ही नावे अयोग्य व पापपूर्ण आहेत. ज्या मंडळीची स्थापना ख्रिस्ताने केली आहे पवित्र शास्त्रामध्ये त्यास खालीलप्रमाणे विविध नावांनी संबोधित केले गेले आहे.

| | |
|---|---|
| देवाची मंडळी | - प्रेषित २० : २८, २ करिंथ १ : १ |
| ख्रिस्तांचे शरीर | - कलस्सै १ : १८, २४ |
| | इफिस १ : २२ - २३ |
| ख्रिस्ताचे राज्य | - कलस्सै १ : १३ |
| ज्येष्ठांचा समाज व मंडळी | - इब्री १२ : २३ |

यावरून स्पष्ट होते की, ज्या मंडळीस प्रभू येशूने स्थापित केले तिचा पवित्र शास्त्रात मानवांशी संबंधित अशा कोणत्याही प्रकारच्या नावाने कधीच निर्देश केला गेला नाही. ही गोष्ट अवश्य लक्षात ठेवली पाहिजे की, जी गोष्ट परमेश्वराची आहे तिच येशूचीही आहे. अर्थात परमेश्वर व ख्रिस्त एकच आहेत.

अर्थातच वरील उल्लेखित नावे त्याच मंडळीची नावे आहेत, जिची स्थापना येशूने केली आहे. मत्तय १६: १८ मध्ये त्याने म्हटले आहे, "आणखी मी तुला सांगतो, तू पेत्र आहेस आणि ह्या खडकावर मी माझी मंडळी रचिन व तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वारांचे काहीच चालणार नाही", "माझी" इतर अन्य कोणत्याही नावाची नाही. "मंडळी" म्हणजे विविध मंडळ्या नव्हे आणि त्या एक्लेसियेच्या सर्व मंडळ्यांना एकत्रित संबोधित करून पवित्र शास्त्रात रोमकरास पत्र १६ : १६ मध्ये म्हटले आहे, "ख्रिस्ताच्या सर्व मंडळ्या तुम्हाला सलाम

सांगतात " यावरून स्पष्ट होते की, प्रेषितांच्या वेळी सर्व मंडळ्या केवळ ख्रिस्ताच्या नावानेच संबोधिल्या जात होत्या, कोणत्याही मनुष्याच्या नावाने नव्हे. कलस्सै ३ : १७ मध्ये आपण वाचतो की, " आणि बोलणे किंवा करणे, जे काही तुम्ही कराल, ते सर्व येशूच्या नावाने करा, आणि त्याच्याद्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा" पवित्र शास्त्रात इब्री १०:२५ मध्ये शिकविले आहे की, "आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकांस बोध करावा, ,आणि तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे तुम्हाला दिसते तसतसा तो अधिक करावा."

यावरून असे आढळून येते की, प्रभू येशूद्वारे निर्मित मंडळीचा एकत्रित येण्याचा एक निश्चित दिवस किंवा निश्चित वेळ होती. त्या निश्चित वेळचे वर्णन आपणास प्रेषित २० : ७ मध्ये या शब्दांमध्ये केलेले आढळते, "मग आम्ही आठवड्याच्या पहिल्या दिवशी भाकर मोडण्यासाठी एकत्र जमलो तेव्हा पौलाने त्यांच्याबरोबर भाषण केले, तो दुसऱ्या दिवशी जाणार होता आणि त्याने आपले भाषण मध्यरात्रीपर्यंत लांबविले." अशाच प्रकारे १ करिंथ १६ : १-२ मध्ये लिहिले आहे की, "आता पवित्र जनांसाठी जी वर्गणी गोळा करावयाची तिच्याविषयी मी गलतीयातील मंडळ्यांना आज्ञा दिल्याप्रमाणे तुम्हीही करा. आठवड्याच्या पहिल्या दिवशी तुम्ही प्रत्येकाने जसे आपणाला यश मिळाले असेल त्या मानाने आपणाजवळ द्रव्य जमा करून ठेवावे, अशा हेतुने की, मी येईन तेव्हा वर्गण्या होऊ नयेत." त्यानंतर इफिस ५:१९ मध्ये असे लिहिले आहे की, "स्त्रोत्रे, गीते व अध्यात्मिक प्रबंध ही एकमेकांना म्हणून दाखवा, आपल्या अंत:करणात प्रभूला गायन वादन करा." हीच गोष्ट कलस्सै ३ : १६ मध्ये आढळते, "ख्रिस्ताचे वचन तुम्हामध्ये भरपूर राहो, परस्परास सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा, आपल्या अंत:करणांत देवाला स्त्रोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा." यावरून या सर्व गोष्टी आपणास विदीत

करतात की, त्या वेळच्या मंडळीमध्ये वचनांचा प्रचार केला जात होता, दान गोळा केले जात होते आणि ते सर्व मिळून भजन व आत्मीक गीतांचे गायन करीत असत आणि त्यांच्या एका जागी एकत्रित येण्याचे कारण खालीलप्रमाणे आहे.

पवित्र शास्त्रांत मत्तय २६ : २६-२९ तसेच मार्क १४ : २२ - २५ आणि लूक २२ : १९ -२० मध्ये "आपण एकत्रित भोजन करू या" या विषयी आपण वाचतो की ज्याची स्थापना स्वत: प्रभू येशूने केली होती, त्यासच "प्रभू भोजन" अथवा "सहभागिता" असे म्हटले जाते. मार्क १४ : २२ -२५ मध्ये पवित्र शास्त्रांत म्हटले आहे की, "ते भोजन करीत असता त्याने भाकर घेवून व आशीर्वाद देवून ती मोडिली आणि त्यास देऊन म्हटले, घ्या हे माझे शरीर आहे, आणि त्याने प्याला घेतला व उपकारस्तुति करून त्यांना तो दिला, आणि ते सर्वजण त्यातून प्याले. तो त्यांना म्हणाला, हे "(नविन) करार" प्रस्थापित करणारे माझे "रक्त" आहे, हे पुष्कळांकरिता ओतिले जात आहे. मी तुम्हास खचित सांगतो की, मी देवाच्या राज्यात नवा द्राक्षरस पिईन त्या दिवसापर्यंत आतापासून द्राक्षवेलाचा उपज पिणारच नाही. लूक २२ : १९ मध्ये म्हटले आहे की, "मग त्याने भाकरी घेवून व उपकारस्तुति करून ती मोडिली आणि त्यांना ती देऊन म्हटले, हे माझे शरीर आहे, ते तुम्हासाठी दिले जात आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा आणि पुन्हा मत्तय २६:३० मध्ये लिहिले आहे की, "नंतर गीत गाऊन ते जैतूनच्या डोंगरावर निघून गेले" यावरून स्पष्ट होते की, खास प्रभु-भोजनात सहभागी होण्यासाठी एकत्रित येत असत, आणि त्यावेळी त्यांच्यात वचनांचा प्रचार होत असे, गीत गाईले जात असे, तसेच दान गोळा केले जात असे. १ करिंथ ११ : २३ - २६ मध्ये स्पष्ट होते की, मंडळींने एकत्रित होऊन तेथे उपासनेत हेच केले होते, असे लिहिले आहे की, "कारण जे मला प्रभु पासून मिळाले तेच मी तुम्हाला सांगितले आहे की, ज्या रात्री प्रभू येशूला धरून देण्यात आले

त्या रात्री त्याने भाकर घेतली, आभार मानून ती मोडिली आणि म्हटले हे माझे शरीर आहे, हे तुमच्यासाठी आहे, माझ्या स्मरणार्थ हे करा. मग भोजन झाल्यावर त्याने प्याला घेऊन तसेच केले आणि म्हटले, हा प्याला माझ्या "रक्ताने झालेला" नवा "करार" आहे, जितक्यांदा तुम्ही ही भाकर खाता व हा प्याला पिता तितक्यांदा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करिता."

ज्या दिवशी या सहभागितेसाठी ख्रिस्ती लोक भेटतात त्याचे वर्णन प्रेषित २० : ७ मध्ये स्पष्ट शब्दात अशा प्रकारे केले आहे, "मग आम्ही आठवड्यांच्या पहिल्या दिवशी भाकर मोडण्यासाठी एकत्र जमलो तेव्हा पौलाने त्यांच्याबरोबर भाषण केले, तो दुसऱ्या दिवशी जाणार होता आणि त्याने आपले भाषण मध्यरात्रीपर्यंत लांबविले "आणि पुन्हा १ करिंथ १६ : २ मध्ये असेच वर्णन आहे. आठवड्याचा पहिला दिवस "रविवार" ह्याच दिवशी येशू मरणातून उठला होता, ही जगातील सर्वात अद्भुत घटना आहे. मत्तय २८ : १ - ६ मार्क १६ : २ - ७, लूक २४ : १-३ तसेच योहान २० : १ -२ आणि १९ या वचनांमध्ये येशूच्या पुनरूत्थानाविषयीं आपण वाचतो आणि प्रकटी १ : १० मध्ये ह्या दिवसास "प्रभूचा वार" (प्रभुवार) असे म्हटले आहे.

यावरून लक्षात घ्यावे की, ख्रिस्ती लोक आठवड्याच्या पहिल्या दिवशी "प्रभुवारी" प्रभु-भोजनात सहभागी होऊन मरणाचे स्मरण करण्यासाठी त्याचप्रमाणे वचनांचे अध्ययन, गायन, प्रार्थना आणि मंडळीच्या कार्याकरिता दान देण्यासाठी एकत्रित येतात.

पौल २ रे करिंथ ९ : ६ -७ मध्ये करिंथ येथील ख्रिस्ती मंडळीस लिहून कळवितो की, "हे ध्यानांत घ्या की, जो हात राखून पेरितो तो त्याच मानाने कापणी करीत, आणि जो सढळ हाताने पेरितो तो त्याच मानाने कापणी करील, प्रत्येकाने आपआपल्या मनात ठरविल्याप्रमाणे द्यावे, दु:खी मनाने किंवा देणे भाग पडते म्हणून देऊ नये, कारण संतोषाने देणारा देवाला प्रिय असतो."

लूक ६ : ३८ मध्ये म्हटले आहे की, "द्या म्हणजे तुम्हास दिले जाईल, चांगले माप दाबून, हालवून व भरून तुमच्या पदरी घालतील, कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हाला परत मापून देण्यात येईल." या गोष्टीवर विचार केला पाहिजे.

काय पवित्र शास्त्राच्या वाचनाने व अध्ययनाने या गोष्टी स्पष्ट होत नाहीत ?

ooo

| | |
|---|---|
| देवाची मंडळी | - प्रेषित २० : २८, २ करिंथ १:१ |
| ख्रिस्तांचे शरीर | - कलस्सै १ : १८, २४ |
| | इफिस १ : २२ - २३ |
| ख्रिस्ताचे राज्य | - कलस्सै १ : १३ |
| ज्येष्ठांचा समाज व मंडळी | - इब्री १२ : २३ |

# देवापासून जन्म पावल्याची लक्षणे

**जेरी बेट्स**

येशू हा ख्रिस्त आहे, असा विश्वास जो कोणी धरतो तो देवापासून जन्मलेला आहे आणि जो कोणी जन्मदात्यावर प्रीती करतो तो त्याच्यापासून जन्मलेल्यावरही प्रीती करतो. आपण देवावर प्रीती करतो व त्याच्या आज्ञा पाळतो तेव्हा त्यावरून आपल्याला कळून येते की, आपण देवाच्या मुलांवर प्रीती करतो. देवावर प्रीती करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे होय आणि त्याच्या आज्ञा कठीण नाहीत. कारण जे काही देवापासून जन्मलेले आहे ते जगावर जय मिळविते आणि ज्याने जगावर जय मिळविला तो म्हणजे आपला विश्वास. येशू देवाचा पुत्र आहे असा विश्वास जो धरतो त्याच्यावाचून जगावर जय मिळविणारा कोण आहे? (१ योहान ५:१-५)

पहिल्या योहानाच्या लहानशा पत्रामध्ये, योहानाने सात वेळेस ''देवापासून जन्मलेला हे लहानसे विधान केले आहे. नक्कीच ''देवापासून जन्मलेला '' हे विधान अशाच प्रकारचे आहे, की ज्याप्रकारे त्याचे संभाषण निकदेमाबरोबर झाले. हे येशूने योहान ३ मध्ये दर्शविले आहे. ह्या संभाषणामध्ये येशूने निकदेमाच्या मनामध्ये असलेल्या आत्मिक पुन्हा जन्म व शारीरिक पुन्हा जन्म ह्याची तुलना

केली आहे. खरे ख्रिस्ती बनणे हे साधारणपणे पुन्हा जन्म जन्म घेणे असे दाखविले आहे, आणि ह्याचे मार्गदर्शन येशूने निकदेमाला केले. (योहान ३:३-५) आम्हाला पाण्यापासून आणि आत्म्यापासून जन्म घेणे आवश्यक आहे. पाणी हे पाण्याच्या बाप्तिस्म्याला दर्शविते आणि आत्म्यापासून जन्म घेणे म्हणजे शारीरिक जन्मापेक्षा देवाच्या सामर्थ्याने आध्यात्मिक जन्म प्राप्त करणे होय.

त्याच्या पहिल्या पत्राच्या दुसऱ्या बाजूमध्ये खरे ख्रिस्ती गुणधर्म प्रदर्शित व्हावे हे योहानाने दर्शविले आहे. त्याने ख्रिस्ती लोकांनी दाखवावे असे तीन अत्यावश्यक गुणधर्म सांगितले आहे. पवित्र जीवन, प्रीतीचे जीवन आणि येशू हाच ख्रिस्त आहे हा विश्वास. नक्कीच खऱ्या ख्रिस्ती जीवनात हे प्रत्येक आवश्यक व महत्त्वाचे आहेत. खरोखर, आपण जर वरील वचनामध्ये पाहिले तर ते सर्व सारखेच आहेत.

योहानाने ख्रिस्तीलोक विश्वास ठेवतात की येशू हाच "ख्रिस्त" आहे हे घोषित केले. "ख्रिस्त" ह्या शब्दाचा अर्थ "देवाचा अभिषिक्त" होय. अभिषिक्त करणे हे दर्शविते की येशूला देवाच्या द्वारे राजा आणि याजक असा दुहेरी अभिषेक करण्यात आला. "राजा" अधिकाराची कल्पना धारण करतो. तसेच "याजक" होणे हे बलिदानाची आणि देव आणि मानवामध्ये मध्यस्थ होण्याची कल्पना धारण करते. आपण फक्त पुन्हा जन्म प्राप्त करण्यासाठीच येशू हा ख्रिस्त आहे असा विश्वास ठेवू नये पण सर्वदा तोच ख्रिस्त आहे असा विश्वास ठेवला पाहिजे. मंडळीच्या सुरूवातीच्या इतिहासात पहिला खोटा सिद्धांत पसरविण्यात आला की येशू देव होत पण खरा मानव नव्हता. तो मानव म्हणून प्रगट झाला किंवा मानवाचे रूप घेतले, त्या देवदूताप्रमाणे की जे सदोम आणि गमोराचा नाशाच्या वेळेस अब्राहमास चेतावणी देण्यासाठी प्रकट झाले. योहानाने ह्याचप्रकारच्या चुकीची चेतावणी दिली की जे कोणी नाकारतात की येशूने देहधारण देवापासून केले नाही.(१ योहान ४:२).आज ह्या दोहोतही अतिशय विश्वास ठेवणारी लोक आपल्याकडे आहेत. काही लोक येशू मानव आहे हे नाकारतील, तसेच येशूचे देवत्व

काही नाकारतील. योहानाने म्हटले आपण दोन्हीवरही विश्वास ठेवला पाहिजे, की येशू देहात आला आणि हे सुद्धा की तो पूर्वीपासून अस्तित्वात होता की जो देवाचा पुत्र म्हणून जन्मला होता.

येशू हाच ख्रिस्त आणि देवाचा पुत्र आहे. असा पवित्रशास्त्रीय हुकूमनामा विश्वास ठेवण्यासाठी असून सुद्धा "विश्वासी" "ख्रिस्ती" असा दावा करणारे अनेक लोक सतत अविश्वास दाखवितात. ते येशूचे अनेक मूलभूत महत्त्वाचे सत्य नाकारतात. ते कुमारीच्या पोटीचा त्याचा जन्म नाकारतात. पवित्रशास्त्रात नमूद केलेले त्याचे चमत्कार ते धुडकावितात, तरीही त्याचे महान कार्य ते कबूल करतात. शुभवर्तमानामध्ये शिकविलेले सर्व चमत्कार ते अमान्य करतात. पुनरूत्थान नाकारणारे सुद्धा अनेक आहेत. हे सर्व नाकारून सुद्धा ते ख्रिस्तीपणाचा दावा करतात. कारण येशूने महान गोष्टी शिकविल्या आणि चांगला मानव होता असा ते विश्वास ठेवतात. ही फक्त खोटी कल्पना आहे हे योहानाने स्पष्टपणे जाहीर केले. येशूबद्दल चांगले विचार असण्यापेक्षा ख्रिस्ती होणे अधिक मोठे आहे. तो चांगला शिक्षक होता, असा फक्त विश्वास ठेवण्यापेक्षा ते कितीतरी अधिक आहे. तो देवाचा पुत्र आहे. असा विश्वास आपण ठेवलाच पाहिजे. (योहान ५:१८) जसे आपण आहो तसा देव देही झाला असा विश्वास आपण ठेवलाच पाहिजे. ह्या मूलभूत सत्याच्या विश्वासाला नकार देणे म्हणजे की खरोखर देवापासून एखाद्याचा जन्म नाही किंवा खरोखर ख्रिस्तच नाही.

दुसरे म्हणजे आपण पाहतो की, ख्रिस्तामध्ये स्वाभाविक विश्वासाचा परिणाम आपल्या बंधूवर खरे प्रेम असणे होय. नवीन जन्मामुळे देवाच्या लेकरांसोबत आपले प्रीतीचे नातेसंबंध तयार होतात आणि त्याच्या लेकरांवर प्रीती असल्याशिवाय आपण देवावर प्रेम करू शकत नाही. कारण ते आपलेच बांधव आहेत. हेच योहानाने घोषित केले आहे की सत्य परिस्थितीनुसार जर आपण खरोखर देवावर प्रेम करतो, तर ते प्रेम आपल्या बंधूवर करण्याचा आपण निश्चय करतो. इतरांवर प्रेम असल्याशिवाय आपण एखाद्यावर सुद्धा प्रेम करू शकत

नाही. तरीही दु:खाने सांगावेसे वाटते की, बांधवामध्ये प्रेमाच्या कमतरतेचे प्रदर्शनच आपल्याला अनेकदा पाहायला मिळते असे व्हायला नको.

तसेच योहानाने लिहिले आहे की, ख्रिस्ती जीवन पवित्र आणि शुद्ध जीवन आहे. देवावर प्रेम आणि त्याच्या आज्ञेचे पालन हे एकमेकांबरोबर जातात. पुन्हा दुसरी गोष्ट केल्याशिवाय तुम्ही पहिली करू शकत नाही. जीवनात स्पष्टपणे देवासाठी खरे प्रेम वचनाच्या आज्ञा पालनाद्वारे सर्वदा प्रदर्शित व्हायला पाहिजे. नंतर येशूवरील विश्वासाद्वारे आपण जगावर जय मिळवितो हे बोलून योहान हा भाग पूर्ण करतो. या रितीने, योहानाच्या वादाचा सारांश, त्याने घोषित केले की, येशू ख्रिस्त आहे हे देवापासून जन्मलेला विश्वास ठेवतो. स्वाभाविकपणे एक ख्रिस्ती देवावर आणि त्याच्या लेकरांवर प्रीती करतो. ह्या प्रितीचे प्रमाण म्हणजे, त्याचे जीवन पवित्र हवे. तो त्याच्या आज्ञा पाळतो कारण त्याने जगावर जय मिळविला आहे. कारण ख्रिस्तावरील त्याच्या विश्वासाद्वारे त्याला हे मिळते.

जगावर जय मिळविणारा खरंच विश्वास होय, पण हा बौद्धिक विश्वासाच्या कितीतरी दूर आहे. ख्रिस्ती जीवनात खरा विश्वास सर्वदा दिसून येतो. विश्वास हा आपला देवासोबतच्या नात्याचा प्रारंभ आणि शेवट आहे, पण "फक्त विश्वास" ह्या प्रकारातला हा विश्वास नाही. पौलाने अशीच भावना गलती ५:६ मध्ये व्यक्त केली आहे, "ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांची सुंता होण्यात किंवा न होण्यात काही सामर्थ्य आहे असे नाही; तर प्रीतीच्याद्वारे कार्य करणारा जो विश्वास त्याच्यात सामर्थ्य आहे."

तुमचा विश्वास किती पक्का आहे?तुम्ही काय बोलाल किंवा विचार कराल यावर काही फरक पडत नाही; तरीपण तुम्ही कसे जगता यावर फरक पडतो.देवापासून जन्म असणे म्हणजे **येशू हा देवाचा पुत्र आहे, ह्या विश्वासाद्वारे पवित्रता आणि प्रीतीने भरलेला गुणधर्म सतत ठेवणे.**जर एखाद्यांने हे गुण प्रदर्शित केले नाही तर योहानाने घोषित

केले की, तुम्ही देवापासून जन्मला नाही आणि म्हणून सार्वकालिक स्वर्गीय जीवनामध्ये तुम्हाला आशा नाही.खात्री असू द्या की देवापासून जन्मपावल्यासारखेच तुमच्या जीवनाद्वारे हे गुणधर्म प्रदर्शित व्हावे.


०००

येशू देवाचा पुत्र आहे
असा विश्वास जो धरतो
त्याच्यावाचून जगावर
जय मिळविणारा कोण
आहे?

(१ योहान ५:१-५)

# दहा आज्ञा

**विलियम वुडसन**



गलती ३:१९ मध्ये पौल नियमाशास्त्राचा उद्देश्य आणि कालावधी दाखवतो. ''ज्या संतानाला वचन दिले ते येईपर्यंत.'' त्याने पहिलेच समजावून सांगितले होते की, ''ते संतान ख्रिस्त आहे.'' (व.१६) ह्याचा अर्थ असा होतो की, नियमशास्त्र ख्रिस्ताच्या येण्यापर्यंत रहाण्यासाठी तयार केल्या गेले होते. पौल पुढे म्हणतो की, ''नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचविणारे बालरक्षक होते.'' (व२४) आणि मग आणखी सांगतो की, ''आपण ह्यापुढे बाल रक्षकाच्या अधीन नाही.'' (व.२५) नियमशास्त्र हे वर्गशिक्षक (बालरक्षक) होते आणि आता आपण वर्ग शिक्षकाच्या अधीन नाही.

अनेक वचने आहेत की ज्याद्वारे माहीत होते की ख्रिस्ताने क्रुसावर नियमशास्त्राला हटविले. "आपल्याविरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकुल असलेले विधीचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केले." (कलस्सै २:१४)

".... नियमशास्त्रही बदलणे आवश्यक आहे. पूर्वीची आज्ञा कमजोर व निरूपयोगी झाल्यामुळे ती रद्द झाली आहे.(इब्री ७:१२, ७:१८-१९; ८:८, ९:१५) क्रुसावर येशूच्या मृत्यूसमयी जुन्या कराराच्या आज्ञेला नाहीसे केले गेले. जेणे करून नव्या कराराला स्थापित केले जावे (इब्री १०:९).

त्या नाहीशा केल्या गेलेल्या नियमशास्त्रात दहा आज्ञा देखील समाविष्ट होत्या. त्या दहा आज्ञा "दगडी पाट्यावर" लिहिल्या गेल्या होत्या. (अनुवाद ४:१२-१३). "मृत्यूचा करार" "दोषी ठरविणारा" आणि 'नाहीसा होणारा" होता. आज आमच्यासाठी 'धर्मिक ठरविणारा" "ख्रिस्ती करार" आहे, जो गौरवात दहा आज्ञापेक्षा अधिक "अढळ आहे" (२ करिंथ ३:६-११).

सिद्धांतरूपामध्ये ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर एक सोडून बाकी सर्व आज्ञा पुन्हा सांगितल्या गेल्या आहेत.

१) माझ्याशिवाय तुला अन्य देव नसावे. (प्रेषित १७:२३-३१; रोम १:२३-२५; १ करिंथ ८:४-६).
२) तू आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नको. (प्रेषित १४:११-१७; १ करिंथ ६:९-१०; १०:७; १४, १९,२०; २ करिंथ ६:१६, १७; गलती ५:१९-२१; इफिस ५:३-६; कलस्सै ३:५, १ योहान ५:२१; प्रकटी २१:८).
३) तू आपल्या परमेश्वराचे नाव व्यर्थ घेऊ नको. (याकोब ५:१२)
४) तू शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून पवित्रपणे तो पाळ. केवळ हीच एक आज्ञा आहे की जिला ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर पुन्हा सांगितल्या गेले नाही. नवीन करारातील मंडळीमध्ये शब्बाथाचा दिवस उपासनेचा दिवस नव्हता. मंडळी प्रभू भोजनामध्ये भाग

घेण्यासाठी आणि वर्गणी वेगळी काढून ठेवण्यासाठी आठवड्याच्या पहिल्या दिवशी एकत्र येत होती. (प्रे.कृ.२०:७; १ करिंथ १६:१-२) शब्बाथा पाळण्यासाठी चुकीचे ठरविल्या गेले(गलती ४:१०-११; कलस्सै २:१६-१७).

५) तू आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान राख (इफिस ६:३; कलस्सै ३:२०).

६) तू खून करू नको (राम १३:९;१ योहान ३:१५; प्रकटी २१:८; २२:१५).

७) व्यभिचार करू नको (रोम १३:९; १ करिंथ ६:१३-१८; गलती ५:१९-२१; इफिस ५:३-६; कलस्सै ३:५; १ थैस्सलनी ४:४-७; इब्री १३:४; प्रकटी २१:८; २२:१५).

८) चोरी करू नको. (रोम १३:९; १ करिंथ ६:१०-११; इफिस ४:२८).

९) आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नको (रोम १३:९).

१०) आपल्या शेजाऱ्याच्या घराचा लोभ धरू नको(रोम ७:७; १३:९; १ करिंथ ६:१०; इफिस ५:५ कलस्सै ३:५; १ तिमथी ६:९-११; १७; इब्री ३:५).

ह्या गोष्टीने व्यथित होऊ नका की दहा आज्ञांना रद्द केल्या गेलेले आहे. लक्षात ठेवा की एक नवीन करार करण्यात आलेला आहे.

ooo

# परमेश्वर

## परमेश्वराचा न्याय

**वेयन बॅरियर**

वाचा उपदेशक १२ :१३, १४

१) परमेश्वर वास्तविक आहे आणि त्याने मनुष्यावर आपली इच्छा प्रकट केली आहे.

२) मनुष्य जे काही करतो किंवा करण्यास अपयशी ठरतो. त्यासाठी त्याला उत्तरदेही ठरविल्या जाणार.

३) त्याच्या विचारांसोबतच त्याची कार्ये परमेश्वरासमोर बिलकूल उघड आहेत आणि एक दिवस त्यांना उघड करून न्याय केला जाईल.

**मुख्य भाग**

क) काय न्याय होईल. (मत्तय २५:३१,३२; इब्री ९:२७; २ पेत्र २:९; ३ :७; १ योहान ४:१७) ?

ख) काय आमचा न्याय दिल्या गेलेल्या संधीनुसार होईल. (मत्तय ११ :२२, लुक १२:४८)

ग) काय आमचा न्याय आमच्या कृत्यानुसार होईल. (यिर्मया १७:१०; मत्तय १६:२६; २ करिंथ ५:१०; १ पेत्र १:१२; प्रगटी २०:१२; २२:१२) ?

घ) कोणाचा न्याय होईल. (उत्पत्ति १८:२५; स्तोत्र ५८:११; ९६:१३; उपदेशक ३:१८; १२:१३,१४; इब्री १२:१३)?

**सारांश :**

क) परमेश्वर आमचा न्याय आपला पुत्र येशूच्या द्वारे करील. (मत्तय २५:३७; योहान ५:२२; प्रेषित १०:४२; १८:३१; रोम २:१६; १४:१०; २ तिमथी ४:१)

ख) काय आज्ञा न पाळणाऱ्यांना देवाची कृपा वाचविल. (कलस्सै २:८-१०; २ थैस्सलनी १:७-९; १ पेत्र ४:१७,१८.)

○ ○ ○

**परमेश्वर वास्तविक आहे आणि त्याने मनुष्यावर आपली इच्छा प्रकट केली आहे.**

# एकतेसाठी एक विनंती

- जे.सी.चोट

ख्रिस्ताची मंडळी भारतात आज लहान प्रमाणात आहे. जगाच्या कित्येक भागामध्ये ख्रिस्ताची मंडळी विद्यमान आहे. सुरूवातीला मंडळीची स्थापना येरूशलेममध्ये झाली होती. (प्रेषितांची कृत्ये दुसरा अध्याय). परंतु वास्तविकता ही आहेकी, आताच काही वर्षापूर्वी आमच्या आधुनिक युगामध्ये, सत्यामध्ये असलेल्या मंडळीविषयी लोकांना माहिती होत आहे. मंडळी कोठवर विद्यमान राहील, हे या गोष्टीवर अवलंबून राहते की, या मंडळीचे सदस्य किती विश्वासाच्या योग्य आहेत. तसेच सुवार्तेचा प्रचार-प्रसार किती केला जातो? विश्वासू बनून राहण्यासाठी पवित्र शास्त्राचे अध्ययन करणे तसेच शिक्षणात बनून राहणे फार आवश्यक आहे.

कित्येक लोक आले आणि त्यांनी ख्रिस्ताच्या मंडळीच्याविषयी लोकांना सांगितले. दक्षिण भारतामध्ये ख्रिस्ताच्या मंडळीचा फार प्रचार झाला आहे आणि तेथील लोकांनी सुवार्तेच्या प्रति खूप उत्साह दाखविला आहे आणि आज तेथे ख्रिस्ताच्या मंडळ्या खूप जास्त प्रमाणात आढळतात.

आज आमच्या जगात ख्रिस्तीपणा वाटल्या गेला आहे. लोक विभिन्न प्रकारच्या शिक्षणाकडे जात आहे. प्रचारक लोक असे शिक्षण देत आहेत ज्याच्याविषयी आम्हाला पवित्र शास्त्रात वाचायला मिळत नाही. परमेश्वरही या सर्वांकडून प्रसन्न होत नाही. आज लोक ख्रिस्ताला विभागलेल्या रूपात पाहतात.आपण जर पाहणी केली तर जगामध्ये खूप सारे पंथ आहेत आणि त्यांची संख्या कित्येक हजारामध्ये आहे. सर्व म्हणतात की आमचे शिक्षण बरोबर आहे. परंतु येशूने म्हटले होते ''मला प्रभूजी प्रभूजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकांचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल''

असे नाही तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल.(मत्तय ७:२१).

तुम्ही प्रभूच्या इच्छेप्रमाणे चालत आहात काय? जर सर्व प्रभूच्या इच्छे अनुसार चालता तर जगामध्ये ख्रिस्तीपणामध्ये एकता होईल. आज सर्व येशूमध्ये विश्वास करणाऱ्यांना पवित्र शास्त्रांकडे वळून, एका व्यासपीठावर यायला पाहिजे.


जर तुम्ही एका नव्या करारा नियमानुसार ख्रिस्ती आहात तर तुम्हाला नवीन कराराच्या मंडळीविषयी दुसऱ्यांना सांगितले पाहिजे. या ख्रिस्ती धर्माबद्दल आम्ही पवित्र शास्त्रात वाचतो. तुम्ही सुशिक्षित आहात किंवा असुशिक्षित, तुम्हाला हा प्रयत्न केला पाहिजे की तुम्ही सत्याच्या मंडळीबद्दल दुसऱ्यांना सांगितले पाहिजे. ख्रिस्ताच्या मंडळीच्या सभासदाचा उद्देश हा आहे की त्यांनी सुवार्ता प्रसार करावा.

पवित्र शास्त्रात आपण त्या ख्रिस्ती लोकांबद्दल वाचतो जे करिंथ येथे राहत होते. ते प्रभूचे लोक होते. त्याच्या मंडळीत ते होते. परंतु आपसात त्यांची फूट पडली होती. आता पहा पौल त्यांना काय म्हणतो, "बंधूजनहो, आपला प्रभू येशू ह्याच्या नावाने मी तुम्हास विनंती करितो की तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे. म्हणजे तुमच्यामध्ये फूटी पडू नयेत. तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.कारण माझ्या बंधुंना तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच्या माणसाकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकजण मी पौलाचा,मी अपुल्लोसाचा, की केफाचा आणि मी ख्रिस्ताचा आहे असे म्हणतो. ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय"? पौलाला तुम्हासाठी वधस्तंभावर खिळले होते काय? पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला होता काय?(करिंथकरास पहिले पत्र १:१०-१३). प्रेषित पौलाने त्यांना या गोष्टीसाठी दटावले होते की आपसात त्यांची फूट पडली होती ते चूक करत आहेत.आज जर पौल ह्या जगात असता तर फूट पडलेले ख्रिस्तीत्व पाहून त्याला किती दु:ख झाले असते?

आम्ही पुढे वाचतो जेव्हा पौलाने ख्रिस्ती लोकांना विश्वासणाऱ्यांना म्हटले होते, "आता बंधुजनहो मी तुम्हाला विनंती करितो की, तुम्हाला जे शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे फूटी व अडथळे घडवून आणीत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांच्यापासून दूर व्हा. कारण तसले लोक आपल्या प्रभू ख्रिस्ताची सेवा करीत नाहीत तर स्वत:च्या पोटाची सेवा करितात आणि गोड व लाघवी भाषणाने भोळ्याच्या अंत:करणास भुलवितात" (रोमकरास पत्र १६:१७-१८). प्रेषित पौलाने हे पण म्हटले होते की, त्यांच्या जाण्याच्या पश्चात फाडणारे लांडगे त्यांच्यामध्ये शिरतील आणि कळप किंवा मंडळीला सोडणार नाही. पौल म्हणतो,"तुम्ही स्वत:कडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या. ह्यासाठी की, देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वत:करिता मिळविली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकीही काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील" (प्रेषितांची कृत्ये २०:२८-३०).

येशूने आपल्या लोकांच्या एकतेसाठी प्रार्थना केली होती. (योहान १७:२१). धार्मिक जगामध्ये फूट आहे. ज्याचा आपण नेहमी विरोध करतो. आज जगामध्ये ख्रिस्तीत्व विभिन्न तुकड्यामध्ये वाटलेली आहे. जर सर्व विश्वास ठेवणारे पवित्र शास्त्राच्यानुसार येतील तर एकता संभव होऊ शकते. (इफिसकरास पत्र ४:४-६). प्रभूच्या मंडळीतही सभासदांना आपले ध्यान ठेवले पाहिजे यासाठी की मंडळीत कोणत्याही प्रकारची फूट नसावी. फुटीमुळे मंडळीला नुकसान होते आणि तो दुसऱ्या समोर एक वाईट उदाहरण होते. आज वेळेचा आवाज हा आहे की लोक सत्य नवीन ख्रिस्तीत्वाकडे परत येतील.

• • •



# पवित्रशास्त्र वाचणे

**- चार्ल्स स्कॉट**

**प**वित्र शास्त्राला समजणे आणि त्यामधून पुष्कळसा लाभ उचलण्यासाठी काही नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामधून काही नियम याप्रकारे आहेत.

पहिले तर आपल्या मनाला तयार करा की, तुम्ही परमेश्वराच्या वचनातून वाचणार आहात. यासाठी आपले ज्ञान, अहंकाराला काढून लेखकाच्या मनात डोकावणे आवश्यक आहे. उदाहरणासाठी जेव्हा प्रभू येशूने हेरोदास खोकड म्हटले, ''त्याने त्याला म्हटले, त्या खोकडाला जाऊन सांगा,पहा, मी आज व उद्या भूते काढतो व रोग बरे करितो'' (लूक १३:३२). आणि आपल्या शिष्यांना म्हटले, तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा. म्हटले तर या अर्थात समजणे चुकीचे आहे, कारण हेरोद खोकड नव्हता आणि शिष्य मीठ नव्हते. परंतु याला यांच्या सांकेतिक प्रकारे वापरण्यात आले आहे आणि याला याच अर्थाच्या अनुसार न समजून त्याचे प्रतिक समजायला पाहिजे. प्रगटीकरण या पुस्तकात पुष्कळशा

चिन्हांचा वापर केला गेला आहे. प्रत्येक देशाच्या साहित्यामध्ये असे सांकेतिक आणि प्रतिक यांचा वापर केल्या जात आहे, यासाठी पवित्र शास्त्रामध्ये या प्रतिकाचा उपयोग काही नवीन गोष्ट नाही.

आम्हा सर्वांसोबत महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की वचनामध्ये परमेश्वर आमच्याच भाषेमध्ये आमच्याशी बोलतो. त्याच्यावर विश्वास ठेवून पवित्रशास्त्र वाचले तर तो तुम्हाला त्याचे ज्ञान आणि समज देईल, तुमच्याबरोबर बोलेल यासाठी की तुम्ही त्याचे ऐकावे आणि त्याला मानावे.

• • •

> ''मी तुझे दु:ख व तुझे गर्भधारण बहुगुणित करीन, तू क्लेशाने लेकरे प्रसवशील'' त्याने हे पण म्हटले की, स्त्री व सर्प यामध्ये म्हणजे सर्पाची संतान आणि स्त्रीची संतान यामध्ये वैर स्थापिन. ''आणि तू व स्त्री तुझी संतती व तिची संतती यामध्ये मी परस्पर वैर स्थापिन. ती तुझे डोके फोडील व तू तिची टाच फोडशील'' (उत्पत्ती ३:१५).

# ह्याचा काय अर्थ आहे की स्त्री "बालकाला जन्म देण्याच्या योगे तारण पावेल"

**- बेट्टी बर्टन चोट**

"तथापि मर्यादेने विश्वास, प्रिती व पवित्रता ह्यात त्या राहिल्यास बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल. (तिमथ्याला पहिले पत्र २:१५)

जेव्हाही आम्ही पवित्रशास्त्रामधून या वचनाला वाचतो तर आमचे लक्ष उत्पत्तीच्या तिसऱ्या अध्यायामध्ये वर्णिलेल्या एदेन बागेत आदाम आणि हव्वा यांनी केलेल्या पापाकडे जाते. परमेश्वराने हव्वेच्या केलेल्या कारणाने जेव्हा तिला शाप दिला आणि म्हटले होते की, "मी तुझे दु:ख व तुझे गर्भधारण बहुगुणित करीन, तू क्लेशाने लेकरे प्रसवशील" त्याने हे पण म्हटले की, स्त्री व सर्प यामध्ये म्हणजे सर्पाची संतान आणि स्त्रीची संतान यामध्ये वैर स्थापिन. "आणि तू व स्त्री तुझी संतती व तिची संतती यामध्ये मी परस्पर वैर स्थापिन. ती तुझे डोके फोडील व तू तिची टाच फोडशील" (उत्पत्ती ३:१५). याकडून येणारा तारणारा, ज्याला स्त्रीद्वारे जन्म घ्यायचा होता ही पहिली भविष्यवाणी मानल्या जाते.

ज्या स्त्रीच्या आज्ञा मोडल्याच्या कारणाने पाप आणि मृत्यू जगात आले होते त्याच्याद्वारे पापाचा इलाज कुमारी मरियेद्वारा येशू ख्रिस्ताच्या जन्माच्याद्वारे होणार होता. या प्रकारे बालकाला जन्म देणे मनुष्य जातीला आज्ञा मानण्यासाठी तारणाचा मार्ग बनल्या जाणे होता.

परंतु या सोबतच लेकरे प्रसवल्याद्वारे तारण पावण्याचे दोन अर्थ आहे पहिला म्हणजे ती परमेश्वराची विश्वासू बनून राहील.

परमेश्वराने जेथे आदामाला अर्थातच पुरुषाला कुटुंबाची भौतिक आवश्यकता पूर्ण करण्याची जबाबदारी दिली तसेच स्त्रीला घर कुटुंबाची

आणि लहान लेकरांची जबाबदारी सोपवली तिमथ्याला पहिले पत्र ५:१४ मध्ये स्त्रीला लग्न करणे, मुले प्रसवावी, घर चालवण्याची जबाबदारी दिलेली आहे. वृद्ध स्त्रियांना सांगण्यात आले आहे.'' त्यांनी तरूण स्तियांना असे शिक्षण द्यावे की त्यांनी आपल्या नवऱ्यावर व मुलाबाळांवर प्रेम करावे त्यांनी मर्यादशील, शुद्धाचरणी, घरचे काम पाहणाऱ्या, मायाळू आपआपल्या नवऱ्याच्या अधीन राहणाऱ्या, असे असावे. म्हणजे देवाच्या वचनाची निंदा होणार नाही.

परमेश्वराद्वारा दिलेल्या या कार्याला पूर्ण करूनच स्त्री त्याच्या आज्ञेला इमानदारीने पाळून परमेश्वराला स्वीकार्य होवू शकते. कुटुंबाचा आणि लेकरांचा सांभाळ करणाऱ्या आज्ञेला कोणत्याही प्रकारे स्वत:च्या इच्छेने पूर्ण केल्या जाऊ शकत नाही. कारण हा स्त्रीच्या मुक्तीच्या योजनेचा एक भाग आहे. याप्रकारे स्त्री लेकरे प्रसवण्याद्वारे तारण पावेल. जर ती विश्वासात बनून राहील, स्थिर राहील.

स्त्रीचे लेकरे प्रसवण्याच्याद्वारे तारण पावण्याचा दुसरा अर्थ आहे की तान्ह्या बाळांचे पालन-पोषण करण्याच्या काळामध्ये तिच्या आपल्या आत्मिक जीवनामध्ये पुष्कळ प्रकारचे अडखळण आणि समस्या येतील. आपल्या लेकरांना उपासनेला घेऊन जाणाऱ्या स्त्रीला त्यांच्या आवश्यकतेची, त्यांची ओरडण्याची, आवाज करण्याची आणि त्यांच्या भूकेची समज असते ती जेव्हाही उपासना करेल तेव्हा अडथळा बाधा येईलच. याप्रकारे पवित्र लोकांच्या सोबत आराधना, उपासना करण्यासाठी जातांना तिचे जीवनाचे कित्येक वर्ष निघून जाऊ शकतात. ज्यामध्ये तिला हेही लक्षात राहत नाही की उपासनेमध्ये काय काय झाले होते.

घरामध्येच, तिला आपल्या लेकरांच्या ओरडण्याने आणि त्यांच्या आवश्यकतेच्या कारणाने रोज पवित्रशास्त्र वाचणे, प्रार्थना करणे यासाठी वेळ काढणे कठीण होऊ शकते. जेव्हा तिला वाटते की तिचा आत्मा संतुष्ट झाला नाही, तेव्हा निस्वार्थ होण्याच्या या प्रतिक्रियेतून जात असता, आपल्या हृदयात परमेश्वराला आणि त्याच्या वचनाला ठेवत

शिकू शकते.

परमेश्वराला माहीत होते की, लहान तान्ह्या लेकराची परिस्थिती आणि त्याची आवश्यकता काय असेल? त्याने या आवश्यकतेला पूर्ण करण्यासाठी स्त्रीला, परमेश्वराच्या सृष्टीला कोमलता, धीर, कोमल हृदय, अनुभवी मन, अतुट प्रेम करण्याचे अनेक गुण दिले आहे. या सर्व गोष्टी त्यापर्यंत पुरुष पोहचू शकत नाही. एका आईसाठी आपल्या लेकरांचे पालनपोषण करणे, रोज परमेश्वराने दिलेल्या गुणामध्ये वाढणे आणि आपल्या लेकरांबरोबर आणखी प्रेम, धीराने आणि मोठ्या समजदारीने व्यवहार करायला शिकणे आवश्यक आहे. असे केल्याने परमेश्वराद्वारे तिला दिल्या गेलेल्या कार्याला पूर्ण करून ती आपल्या जीवनाला समृद्ध तसेच भक्तिपूर्ण बनविते.

परंतु कठीण समस्यामध्ये तिला विश्वासू बनून राहणे आवश्यक आहे. अडखळणाशिवाय उपासनेच्या कमी वेळेव्यतिरिक्त अध्ययनासाठी वेळ काढून परमेश्वराच्या वचनाने आपली आत्मिक भूक मिटविण्याशिवाय या सत्याशिवाय त्या वर्षामध्ये तिला परमेश्वरासोबत आपले व्यक्तिगत संबंध पूर्ण मनाने बनून ठेवणे आवश्यक आहे. मातृत्वाच्या पुष्कळशा आव्हानांचा सामना करते वेळी तिला शिकणे आवश्यक आहे.

- परमेश्वरामध्ये खोलवर विश्वास.
- त्याच्या सांभाळण्यावर आणि निर्भरतेवर.
- त्याच्यासाठी जिवंत प्रेम.
- आणखी अधिक पवित्रता.
- आणि निश्चयच आत्मसंयमाच्या अनुशासनाला व्यवहारामध्ये आणण्याचा पर्याय प्राप्त होईल.

तिच्यामध्ये हे गुण असणे आवश्यक आहेत. कारण जर तिचाच संबंध आपल्या परमेश्वराबरोबर नाही तर ती आपल्या लेकरांना कसे शिकवू शकते? की त्यांनी परमेश्वरावर भरोसा ठेवावा. परंतु लेकरांची

आत्मिक मार्गदर्शन करत आपल्या उन्नतीचा प्रयत्न करत ती एक अशी आत्मिक व्यक्ती बनून जाईल ज्या जीवनाच्या सर्व आव्हानांचा सामना परमेश्वरासमोर समर्पण आणि त्याच्यावरील विश्वासाने करू शकते.

"तथापि मर्यादेने विश्वास, प्रिती व पवित्रता ह्यात त्या राहिल्यास बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल."

• • •


"मी तुझे दु:ख व तुझे गर्भधारण बहुगुणित करीन, तू क्लेशाने लेकरे प्रसवशील" त्याने हे पण म्हटले की, स्त्री व सर्प यामध्ये म्हणजे सर्पाची संतान आणि स्त्रीची संतान यामध्ये वैर स्थापिन. "आणि तू व स्त्री तुझी संतती व तिची संतती यामध्ये मी परस्पर वैर स्थापिन. ती तुझे डोके फोडील व तू तिची टाच फोडशील" (उत्पत्ती ३:१५).

# आम्हा पूर्ण सत्य दे

**- कैरोल साइटस**

"**ज्या** यहुद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेविला त्यांना येशू म्हणाला तुम्ही माझ्या वचनात राहिला तर खरोखर माझे शिष्य आहा. तुम्हाला सत्य समजेल व सत्य तुम्हाला बंधमुक्त करील. (योहान ८:३१-३२)

ऐलन रैडपाथचे अवलोकन आहे. पुष्कळशा ठिकाणी विचित्र सुवार्ता सांगण्यात येत आहे. यामध्ये कृपेला प्रमुखता दिल्या जाते, परंतु पूर्ण आज्ञापालनाला दृष्टीआड केल्या जाते. संपूर्ण संदेश न दिल्या गेल्या कारणाने ज्यामध्ये केवळ पापांचीच क्षमा नाही परंतु पापाच्या शक्तीपासून सुटकेचा सिद्धांत पण असावा, असायलाच पाहिजे. अशा काही स्वतंत्र ख्रिस्ती गटांची एक पिढी बनल्या गेली आहे, जे परमेश्वराबरोबर वाढलेले नाहीत आणि त्यांची उन्नतीही होत नाही.



परमेश्वराचे मोफत वरदान आमच्या येशू ख्रिस्तामध्ये तारण आहे. (रोमकरास पत्र ६:२३). परंतु ही गोष्ट मनुष्याद्वारे केल्या गेलेल्या आज्ञापालनाचा नकार देत नाही. कोणतेही शिक्षण जे हे दाखवते की मनुष्य विना आज्ञापालनाने

परमेश्वराच्या कृपेने तारण प्राप्त करू शकतो तर ते परमेश्वराच्या कृपेच्या महत्त्वाला कमी करते. आमचे तारण कृपेने विश्वासाद्वारे होते. (गलीकरास पत्र २:८). आमचे तारण आज्ञापालनानेही होते. (मत्तय ७:२१, इब्रीलोकास पत्र ५:९). परमेश्वर अज्ञापालनाला नाकारत नाही आणि आज्ञापालन कृपेला नाकारत नाही. कृपा परमेश्वराकडून होते जेव्हा आज्ञापालन मनुष्याकडून होते. परमेश्वराने कधीच म्हटले नाही की तो आम्हाला काही न करता काही देईल.

आमची आवश्यकता सत्य, परंतु पूर्ण सत्याची आहे. सत्यापेक्षा कमी काही नाही. आपले दोष उघड करणे, रागावणे आणि समजावल्या जाणे आवश्यक आहे. ( तिमथ्याला दुसरे पत्र ४:२). आम्हाला त्याच्या वचनाची आवश्यकता आहे. आमच्यासाठी वचनाद्वारे तारण पावणे, वचनाद्वारे वाढणे आणि वचनाद्वारे जगणे आवश्यक असे आहे कारण वचनाद्वारेच आमचा न्याय होईल. (योहान १२:४८).

आम्हाला सत्य, संपूर्ण सत्य दे. सत्याशिवाय आणखी काही नाही.

• • •

"बंधूजनहो, आपला प्रभू येशू ह्याच्या नावाने मी तुम्हास विनंती करितो की तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे. म्हणजे तुमच्यामध्ये फूटी पडू नयेत. तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.कारण माझ्या बंधुंना तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच्या माणसाकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकजण मी पौलाचा,मी अपुल्लोसाचा, की केफाचा आणि मी ख्रिस्ताचा आहे असे म्हणतो. ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय"? पौलाला तुम्हासाठी वधस्तंभावर खिळले होते काय? पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला होता काय?(करिंथकरास पहिले पत्र १:१०-१३).

# शांती

**जॅक डब्ल्यू कार्टर**

आपण त्रासांनी आणि संकटांनी भरलेल्या जगात रहात आहोत. एक भांडण मिटत नाही की दुसरे सुरू होऊन जाते. आजारपण,आर्थिक बिकट स्थिती, मरण यासारख्या अनेक गोष्टी आपल्या जीवन आणि सुरक्षेसाठी धोकादायक आहेत. काही गोष्टी वेगाने बदलत आहेत आणि असे वाटते की जग पुढे जात आहे. आणि सतत बदलत आहे. मनुष्याची एवढी किंमत राहिली नाही जी आधी असायची. आपण मानवी जीवन आणि किंमतीवान श्वासाच्या जागेवर अंकाच्या गणनेनीच गोष्ट करतो. ह्या सर्वांच्या मध्ये मानव शांतीच्या शोधात आहे. मनाची शांती आणि इतर लोकांसोबत समेटाच्या शोधात आहेत. अशा अनिश्चित जगामध्ये ते ह्याला कसे प्राप्त करू शकतात.

**ख्रिस्त आमची शांती :**

येशूख्रिस्त ह्याचे उत्तर आहे. त्रासांनी भरलेल्या ह्या जगाच्या प्रवासामध्ये तो आम्हासाठी दिल्या गेलेली परमेश्वराची शांती आहे. येशूने आपल्या शिष्यांना म्हटले होते, "मी तुम्हास शांती देऊन ठेवितो, मी आपली शांती तुम्हास देतो, जसे जग देते तसे मी तुम्हाला देत नाही. तुमचे अंत:करण अस्वस्थ अथवा भयभीत होऊ नये." (योहान १४:२७). येशू दु:खी व भयभीत अंत:करणाला घेऊन

शांतीपूर्ण अंत:करण देतो.

सर्वात प्रथम तो परमेश्वरासोबत समेट घडवितो. पवित्र शास्त्र सांगते की आपल्या पापामुळे मी आणि तुम्ही परमेश्वराचे शत्रू आहोत. रोम येथील ख्रिस्ती लोकांना पौलाने समजाविले होते की, ''कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झालेला असता त्याच्या जीवनाने आपण विशेषकरून तारले जाणार आहो.'' (रोम ५:१०) आपल्या पापामुळे खरोखर आपण पहिले परमेश्वराचे शत्रू होतो पण वधस्तंभावर येशूच्या मृत्यूद्वारे परमेश्वरासोबत समेट झाल्यामुळे आता आपण त्याचे मित्र बनले आहो. पाप आम्हाला परमेश्वरापासून वेगळे करिते. पण येशू त्या पापासाठी मरण पावला. जेव्हा आपण ख्रिस्ताजवळ येतो तेव्हा आमचे पाप क्षमा केल्या जाते आणि आम्हाला खात्री दिल्या जाते की परमेश्वराने त्या पापांना आमच्या विरुद्ध ठेवले नाही. लोक हे मानतात की ते परमेश्वराच्या दृष्टीने पापी आहेत आणि ही गोष्ट त्यांच्या अंत:करणाला त्रासून टाकीते. त्यांना समजून येते की एक दिवस न्यायाच्या वेळी त्यांना परमेश्वरासमोर त्या पापांचे उत्तर द्यावे लागेल. परंतु जेव्हा ख्रिस्त त्यांचे पाप काढून घेतो तेव्हा त्यांचा विवेक शुद्ध होऊन जातो, त्याद्वारे त्यांना शांती मिळते. ख्रिस्ती व्यक्तीला आता त्याचे पाप सतावित नाहीत. परमेश्वराच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे त्याला त्यासोबत मिळविल्या जाते.

**अंत:करणाची शांती :**

दुसरे, ख्रिस्ती व्यक्तीला आंतरिक शांती मिळते. तो परमेश्वरावर भरवसा ठेवतो. त्यामुळे आता त्याला त्यामधील कोणत्याही गोष्टींची चिंता करण्याची आवश्यकता नाही, की ज्याची चिंता जगातील बहुतेक लोकांना असते. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या संबंधी येशूने म्हटले की, ''तर तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवावयाची खटपट करा, म्हणजे याबरोबर तिही सर्व तुम्हास मिळतील.'' (मत्तय ६:३३) जगातील बहुतेक लोक भौतिक सुरक्षेचीच चिंता करतात. त्यांचा

अधिकाधिक वेळ भविष्यासाठी जमा करण्यासाठीच जातो. परंतु ख्रिस्ती व्यक्ती ह्या गोष्टींची चिंता करीत नाही. त्याला माहीत आहे की जो परमेश्वर पाखरांकडे लक्ष देतो आणि त्यांना अन्न देतो तो पाखरांपेक्षा आपल्या लोकांवर अधिक प्रेम करितो. तो येशूच्या अभिवचनावर विश्वास ठेवतो की, "जे रानातले गवत आज आहे व उद्या भट्टीत पडते त्याला जर देव असा पोषाख घालतो, तर अहो तुम्ही अल्पविश्वासी, तो विशेष करून तुम्हाला पोषाख घालणार नाही काय?(मत्तय ६:३०)"

**एकमेकांसोबत शांती :**

शेवटी असे की, ख्रिस्ती व्यक्ती आपल्या शेजाऱ्यासोबत शांतीने रहातो. तो कोणाही विरुद्ध आपल्या अंत:करणात द्वेष ठेवत नाही. ह्या व्यतिरिक्त येशूने आपल्या शिष्यांना आज्ञा दिली आहे, मी तर तुम्हास सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा" (मत्तय ५:४४).

खरोखर ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांनी आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात शांती मिळविली आहे. जरी ती परमेश्वरासोबत समेटाची बाब असो वा आपल्या सोबत व आपल्या शेजाऱ्यासोबत समेटाची बाब असो.

○ ○ ○

कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झालेला असता त्याच्या जीवनाने आपण विशेषकरून तारले जाणार आहो." (रोम ५:१०)

# बाप्तिस्मा - एक प्रारंभ

जिमि जीविडेन



जेव्हा एखाद्याचा बाप्तिस्मा होतो तेव्हा तेथे आनंद का होतो? त्याचे एक कारण हे की बाप्तिस्मा म्हणजे एक नवी सुरूवात. ''म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे, जुने ते होऊन गेले; पाहा ते नवे झाले आहे.'' (२करिंथ ५:१७)

बाप्तिस्मा हा नवा जन्म आहे. जेव्हा कोणी देवाच्या वचनाच्याच द्वारे येवून पाणी आणि आत्म्याच्या द्वारे जन्म घेतो तो देवाच्या राज्याचा नागरिक बनतो. येशूने म्हटले, ''मी तुम्हाला खचित खचित सांगतो, पाण्यापासून व आत्म्यापासून जन्म घेतल्यावाचून कोणीही देवाच्या राज्यात प्रवेश करू शकत नाही'' (योहान ३:५). मूल ह्या नात्याने तो देवाला ''अब्बा बापा'' अशी हाक मारू शकतो. त्याला कुटुंबाची

काळजी असते आणि तो वारसदार बनतो.

बाप्तिस्मा हे पुनरूत्थान आहे. हा एक असा सोहळा आहे ज्यात एखादा त्याच्या जुनेपणाला मरतो आणि बाप्तिस्म्यामध्ये पुरल्या जातो. त्यानंतर "जीवनाच्या नविनतेमध्ये" चालण्यासाठी तो उठविल्या जातो (रोम ६:४-६). बाप्तिस्मा ती कृती आहे जी सर्व गोष्टींना नवीन बनविते. जसा येशू दैहीक मरणातून पुनरूत्थित झाला होता, तसे आपण आध्यात्मिक मरणातून पुनरूत्थित होतो.

बाप्तिस्मा हा तारणाचा सोहळा आहे. जेव्हा जगाचा पाण्याने नाश झाला त्या नोहाच्या तारणाच्या साम्याला अनुसरून पेत्राने म्हटले, "आणि त्या पाण्याचा नमुना जो बाप्तिस्मा.... तुम्हास तारीत आहे." (१ पेत्र ३:२१) अगदी जसे जेव्हा जगाचा पाण्याने नाश होत होता तेव्हा नोहाच्या आज्ञापालनाने त्याला आणि त्याच्या कुटुंबाला वाचविले, तसे जेव्हा जगाचा नाश अग्नीद्वारे होईल तेव्हा एखाद्याचे बाप्तिस्म्यातील आज्ञापालनाद्वारे तारण होईल.

○ ○ ○

"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे, जुने ते होऊन गेले; पाहा ते नवे झाले आहे."

(२ करिंथ ५:१७)

## परमेश्वर

# सर्वांकरीता परमेश्वराची कृपा

**माईकल एल. किंग**

मित्रांनो, हे खरं आहे की जग एका विशाल बागेसारखे आहे. ज्यात प्रत्येक प्रकारचे रंगबेरंगी, लहान-मोठे सुगंधीत आणि असुगंधीत मुलायम व काटेरी झाडे झुडपे बघायला मिळतात. ह्या पृथ्वीवर सरासरी ६०० करोड लोक राहतात आणि त्या लोकांचे वेगवेगळे रंग-रूप आहेत. वेगवेगळ्या भाषा, वेगवेगळी संस्कृती पण त्या सर्व लोकांना एकाच देवाने बनवले आहे. आम्हा सर्वांचा तो परमेश्वर पिता कोणाचाही पक्षपात करीत नाही.

जेव्हा आम्ही शारीरिक दृष्टिकोनातून ह्या गोष्टीवर विचार करतो व आम्ही पाहतो त्या स्वर्गीय पित्याने आम्हा सर्वांसाठी पाणी आणि हवा आणि प्रत्येक प्रकारचे खाण्यापिण्याची वस्तू निर्माण केल्या आहेत. त्याच्या ऊन आणि पावसाचे आम्ही सर्व भागीदार आहोत. तो कुणाचाही पक्षपात करत नाही. होय तो आपली कोणतीही वस्तु जोरजबरीने देत नाही. पण त्याने आम्हा सर्वांसाठी त्या वस्तू बनवल्या आहेत आणि ते सर्व निर्णय आम्हावर आहे की, आम्ही त्याने दिलेल्या वस्तू प्राप्त करून खाणेपिणे व ग्रहण करणे त्या लाभ घेणे आम्हाला स्वत: करावे लागते. देव कुणाचाही पक्षपात करीत नाही. त्याच्यासमोर सर्वजण आपण समान आहोत. त्याने सर्व काही

सर्वांसाठी निर्माण केले. पण त्या गोष्टीला प्राप्त करणे व त्याचा लाभ घेणे हे सर्व काम आमचे आहे आणि जेव्हा ह्या गोष्टीला आम्ही आत्मीक दृष्टिकोनातून पाहतो तर तिथे सुद्धा आम्हाला हीच गोष्ट मिळते की, आता आम्ही सर्व ही गोष्ट जाणतो की सर्व जण पापी आहोत म्हणजेच पृथ्वीवर कोणीही असा मनुष्य नाही की ज्या व्यक्तीने कधीच कोणतेच पाप केले नाही. वास्तविकता: सर्व जग पापांच्या हातात आहे.जिथे मनुष्य आहे तिथे पाप आहे आणि पापामुळे साऱ्या मानवजातीचे भविष्य केवळ नरक आहे. कारण पापासोबत कोणताच मनुष्य देवाच्या पवित्र स्वर्गामध्ये प्रवेश करू शकत नाही. परंतु देव आमचा स्वर्गीय पिता आहे. त्यानेच आम्हास बनविले आहे आणि ह्यामुळे तो आमच्यावर प्रेम करतो आणि कारण तो आमच्यावर प्रेम करतो आणि त्यामुळे त्याची इच्छा आहे की आम्ही सर्वचे सर्व त्याच्याजवळ येऊन त्याच्यासोबत स्वर्गात रहावे. परंतु पाप मध्ये येते व मनुष्याला देवाजवळ जाण्यापासून अडवते.

म्हणून ह्यासाठी पृथ्वीवर मनुष्याचा सर्वात मोठा प्रश्न पाप आहे. पाप सर्वांच्या जीवनात आहे पाप मनुष्याला देवापाशी जाण्यापासून अडवते. मनुष्याने जमिनीवर मोठे मोठे काम केले आहे आणि तो बहुत मोठे मोठे काम करू शकतो; परंतु मनुष्य पापाच्या शिक्षेपासून आपणाला (स्वत:ला) मोकळे करू शकत नाही. ज्याप्रकारे जीवन आणि मृत्यू मनुष्याच्या हातामध्ये नाही. त्याचप्रकारे पापापासून सुटका मिळवणे सुद्धा मनुष्याच्या हातामध्ये नाही.

शास्त्रात लिहिले आहे की, सर्वांनी पाप केले आहे. (रोम ३:२३) परंतु शास्त्रसुद्धा सांगते की, परमेश्वराचा हात इतका लहान नाही की तो मनुष्याला पापांच्या खाचेतून बाहेर काढू शकणार नाही आणि तो असा बहिरा नाही की मनुष्याची तारणासाठी आवाज तो ऐकू शकणार नाही. परंतु तुमचे अपराध व तुमच्या पापांमुळे त्याचे तोंड तुम्हा पासून लपवित आहे व तो तुमचे ऐकत नाही. (यशया ५९:१-२)

ह्यामुळे परमेश्वराजवळ येण्यालायक बनण्यासाठी त्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यायोगे बनण्यासाठी मनुष्याला आपल्या पापापासून सुटका मिळणे आवश्यक आहे. परंतु मनुष्य काहीही करून व काहीही देवून आपल्या पापांपासून मुक्तता मिळवू शकत नाही. त्याला देवाची गरज आहे कारण की फक्त देवच काही असा उपाय काढू शकतो की ज्यामुळे मनुष्याला पापाची शिक्षा पण मिळावी म्हणजेच ज्यामुळे मनुष्याच्या पापाचे प्रायश्चित्त पण व्हावे आणि त्याला पापांपासून मुक्ततापण मिळावी, आणि देवाच्या वचनाचे पुस्तक पवित्रशास्त्र यामध्ये आम्हाला ही सुवार्ता मिळते की, परमेश्वराची ती योजना जी सर्व लोकांच्या तारणाचे कारण आहे. साऱ्या जगामध्ये प्रकट आहे तो आम्हाला सुचवितो की आम्ही सर्व अभक्ती आणि संसारिक अमिषांवरून मन फिरवून धार्मिकतेनुसार जीवन जगावे. धन्य आशा म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रगट होण्याची वाट पहात आपण अभक्तीला आणि ऐहीक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगात मर्यादेने नितीने व सुभक्तीने वागावे. त्याने स्वत:ला आपल्याकरिता दिले. ह्यासाठी की त्याने खंडणी भरून आपल्याला सर्व स्वैराचारापासून मुक्त करावे आणि चांगल्या कामात तत्पर आपले स्वत:चे लोक आपणासाठी शुद्ध करून ठेवावे(तीत २:११-१५).

म्हणजे ह्याप्रकारे आम्ही पाहतो की, सर्व जगातल्या लोकांसाठी पापांपासून मुक्तता मिळविणे गरजेचे आहे. सर्व मनुष्यावर प्रगट आहे आणि परमेश्वराची ती योजना आहे की त्याने आपल्या सोबत राहणारे आपले पवित्र वचन ज्याला त्याने मनुष्यरूपी ह्या जगामध्ये पाठवले ते आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या रूपात, एका मनुष्याप्रमाणे पृथ्वीवर पाठवले आणि त्याच्याद्वारे मनुष्यामध्ये मोठ-मोठी सामर्थ्यशाली कामे केली होती आणि मोठमोठी महत्त्वपूर्वक शिकवण दिली होती. नंतर त्यालाच देवाने आपल्या अद्भूत ज्ञानाने व आपल्या विशाल सामर्थ्याने

पापी मनुष्यांच्या द्वेषास आणि विरोधास निशाणा बनवले, म्हणून ज्या लोकांनी देवाच्या निर्दोष आणि एकुलत्या एका पुत्राला पकडून आणि त्याला दोषी ठरवून त्याला एका अपराध्याप्रमाणे क्रुसखांबावर चढवून मारले आणि ह्याप्रकारे देवाने आपल्या महान आणि अद्भूत योजनेला पूर्ण केले होते की त्याने साऱ्या जगाचे व सर्व लोकांच्या पापांबद्दल आपल्याच एकुलत्या एक पुत्राला दंडीत केले आणि तो क्रुसखांबावर आपल्या निर्दोष बलीदानामुळे साऱ्या जगातील लोकांच्या पापांबद्दल परमेश्वराच्या दृष्टीने प्रायश्चित्त ठरला.

आणि ह्या प्रकारे आज पृथ्वीवर कोठेही कोणीही व्यक्ती येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून आणि पापापासून आपले मन फिरवून आणि आपल्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या आज्ञेनुसार पाण्यामध्ये बाप्तीस्मा घेवून परमेश्वराच्या योजनेनुसार आपल्या पापापासून उद्धार प्राप्त करू शकतो आणि ह्याप्रकारे देवाचे मुले होवून एक चांगले आणि नीट आणि पवित्र जीवन जगू शकतो आणि जो मनुष्य देवाच्या इच्छेनुसार असे करतो तो हे जाणतो की त्याला आपल्या पापांची शिक्षा मिळणार नाही. कारण की देवाचा पुत्र येशू ख्रिस्त त्याच्या पापाचे प्रायश्चित्त आहे आणि तो ह्या जीवनानंतर त्या स्वर्गातील उत्तम जीवनामध्ये प्रवेश करील, जेथे परमेश्वर आणि त्याचे लोक सर्वदा राहतील.

काय तुम्ही परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य केले आहे? काय आपण परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य करून त्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यालायक स्वत:ला तयार कराल?

काय तुम्ही परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य केले आहे? काय आपण परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य करून त्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यालायक स्वत:ला तयार कराल?

ooo

# ख्रिस्ती बनल्यानंतर

**रॉइस फ्रेड्रिक**



आज मी आपल्याला ह्याविषयी सांगू इच्छितो की, जेव्हा कोणी एखादा व्यक्ती ख्रिस्ती म्हणजेच येशू ख्रिस्ताचा अनुयायी बनतो तेव्हा काय होते. आता ह्या गोष्टीवर लक्ष द्या की मी इथे हे म्हणत नाही की, जेव्हा कोणी एक "ख्रिस्ती बनवल्या जातो" परंतु मी हे सांगतो की, जेव्हा कोणी व्यक्ती एक ख्रिस्ती बनतो कारण वास्तविकपणे कोणत्याही मनुष्याला एक ख्रिस्ती बनवल्या जावू शकते. पण प्रत्येक मनुष्याकडे स्वत: आपल्या इच्छेने पश्चात्ताप करून किंवा मन फिरवून परमेश्वराच्या मार्गावर चालण्यासाठी ख्रिस्ती

बनतो. प्रभू येशू ख्रिस्ताने म्हटले होते की मार्ग, सत्य व जीवन मीच आहे आणि माझ्या वाचून पित्याजवळ कोणीही जावू शकत नाही. (योहान १४:६) आणि हेच ते सत्य आहे ज्याला समजून एक व्यक्ती स्वत: आपल्या इच्छेनुसार एक ख्रिस्ती बनू इच्छितो. पण का प्रभू येशूने हे म्हटले मार्ग, सत्य व जीवन मीच आहे आणि माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणीही जावू शकत नाही ?

आता देवाजवळ तर सर्व लोक जावू इच्छितात, कारण सर्व लोकांना हे माहीत आहे की हे जग आमचे सर्वकाळचे घर नाही. आम्हा सर्वांना एक ना एक दिवस येथून जाणे आहे, आणि सर्वच परमेश्वराजवळ जावू इच्छितात. कारण जर कोणी परमेश्वराजवळ गेला नाही तर तो नरकात जाईल आणि नरकात कोणालाही जावू वाटत नाही. परंतु परमेश्वराजवळ जाण्याचा मार्ग कोणाला ठावूक आहे ? कोणत्या मार्गावर चालल्याने आम्ही परमेश्वराजवळ जावू शकतो ?"मार्ग" येशू ख्रिस्ताने म्हटले होते, मी आहे कारण तो म्हणजेच येशू ख्रिस्त देवाकडून आला होता तो देवाचा शब्द होता. तो देव होता तो स्वत: स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता आणि त्याने भूतलावर एका मनुष्यरूपात येवून आपले स्वत:चे बलीदान देऊन साऱ्या मानवजातीच्या पापाचे प्रायश्चित्त केले आणि ह्यामुळेच त्याने म्हटले होते की 'मार्ग' मी आहे. माझ्याद्वारे प्रत्येक मनुष्य परमेश्वराजवळ जावू शकतो. कारण की तो सर्व जगाच्या पापाचे प्रायश्चित्त आहे.

परमेश्वराच्या स्वर्गामध्ये जाण्यास मनुष्याला केवळ एकच गोष्ट थांबवू शकते ती गोष्ट म्हणजेच पाप आहे आणि कोणताच मनुष्य जगामध्ये असा नाही की ज्याने कधीही पाप केले नाही. बायबल आपल्याला सांगते "सर्वांनी पाप केले आहे (रोम ३:२३) पण मनुष्य आपल्या पापापासून मुक्तता स्वत:ला कशी काय देवू शकतो? मनुष्य आपल्या पापाची क्षमा कशी काय मिळवू शकतो. जर कोणी एका खोलीमध्ये स्वत:ला बंद करून पूजा अर्चना करून चांगल्या विचारावर

मन लावू लागला तरी त्याला त्यासर्व पापांची क्षमा कशी मिळेल. जी पापे त्याने खोली बंद करण्याच्या आधी केली होती? म्हणून खरे हे आहे की प्रत्येक मनुष्याला पापामुक्ती मिळवण्याची गरज आहे, पण कशी? काय मनुष्याजवळ अशी कोणतीही वस्तू नाही की, जी परमेश्वराला आपल्या पापांच्या क्षमेबद्दल किंवा पापापासून मुक्ती मिळवण्याबद्दल देवू शकतो ? वास्तविकता ही आहे की मनुष्याजवळ आपले काहीच नाही कारण पृथ्वीवर आणि आकाशामध्ये जे काही आहे ते सर्व परमेश्वराचे आहे कारण ते सर्व परमेश्वराने बनविले आहे. म्हणून आम्ही, आपल्या पापाच्या सुटकेसाठी व पापाच्या क्षमेबद्दल परमेश्वराला काहीच देवू शकत नाही. केवळ परमेश्वराच्याच योजनेच्याद्वारे पापासून तारण होवू शकते किंवा आम्हाला आपल्या पापापासून मुक्ती आणि पापांची क्षमा देवू शकतो. आणि वचनात लिहिले आहे की, ''येशू ख्रिस्ताने परमेश्वराच्या योजनेने प्रत्येक मनुष्याबद्दल मृत्यूचा आस्वाद चाखला (इब्री २:९) म्हणजे येशूला क्रूस खांबावर टांगले. तो देवाकडून आमच्या पापाचे प्रायश्चित्त आहे आणि हेच कारण आहे, की का येशूने असे म्हटले की, माझ्यावाचून परमेश्वराजवळ कोणीही जावू शकत नाही कारण की मार्ग, सत्य व जीवन मीच आहे.

पण येशू ख्रिस्ताजवळ मनुष्य कसा येतो ? कसा तो त्याचा अनुयायी बनतो ? शास्त्रात असे लिहिले आहे की, प्रत्येक व्यक्ती जो ख्रिस्ताच्या सुवार्तेला ऐकतो की येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे तो स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला आणि जो मानवतेच्या पापाचे प्रायश्चित्त करण्यास क्रूस खांबावर देवाच्या इच्छेने बलीदान झाला. जेव्हा तो ह्या सुवार्तेवर विश्वास ठेवतो, ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तर त्याने पश्चात्ताप केला पाहिजे आणि मग ख्रिस्ताची आज्ञा मानून त्याच्या अधिकाराने आपल्या पापाच्या क्षमेसाठी पाण्यामध्ये पुरले जावून बाप्तिस्मा घेतला पाहिजे आणि ह्या प्रकारे पापाच्या जीवनाला मरून आणि पाण्याच्या कबरेमध्ये आपल्या जुन्या मनुष्याला पुरून त्यातून

बाहेर येवून माणूस एक नवा मनुष्य बनतो. ह्याप्रमाणे त्याचा एक नवा आत्मिक जन्म होतो आणि तो ख्रिस्ताचा अनुयायी बनतो. म्हणजेच आता तो आपले जीवन येशू ख्रिस्ताचा आदर्श घेऊन त्यावर चालून जीवन व्यतीत करतो आणि म्हणून तो व्यक्ती एक ख्रिस्ती म्हटल्या जातो.

पण एक ख्रिस्ती बनून त्या व्यक्तीला काय प्राप्त झाले ? का तो सर्व काही सोडून ख्रिस्ताचा अनुयायी बनण्याविषयी सांगत आहे ? आणि का मी स्वत: एक ख्रिस्ती आहे ? ह्यासाठी कारण एक ख्रिस्ती तो व्यक्ती आहे. ज्याला हे माहीत आहे की, येशू ख्रिस्ताच्या क्रुसखांबावरील बलीदानामुळे आणि त्यावर विश्वास ठेवून त्याची सुवार्ता मान्य करून मला माझ्या पापापासून उद्धार मिळाला आहे आणि ह्यासाठी आता मी परमेश्वराजवळ स्वर्गामध्ये जाईल. हाच तो खरा आनंद आहे, हीच ती खरी शांती आहे आणि हीच ती खरी आशा आहे. ज्याची आवश्यकता जगातील सर्व मानवांना आहे. कारण कोण्याही व्यक्तिने पृथ्वीवर जगातील प्रत्येक वस्तू प्रत्येक सुख प्राप्त केले, परंतु आपल्या पापापासून मुक्ती आणि पापक्षमा प्राप्त केल्याशिवाय ह्या जगातून गेला तर त्या मनुष्याची काय इच्छा असेल? पृथ्वीवर तो एक मोठा शक्तीशाली व्यक्ती असू शकतो. आदरणीय आणि सन्माननीय होवू शकतो. तोएक प्रभावशाली व्यक्तीत्वाचा स्वामी होवू शकतो तो धन आणि मान-सन्मानवाला व्यक्ती होवू शकतो. परंतु ज्या क्षणी तो आपले प्राण सोडील तर ह्यातील कोणतीच वस्तू त्याच्या कामाची राहणार नाही. ह्यासाठी प्रभू येशूने शिकवले होते की, "मनुष्याने संपूर्ण जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ ? अथवा मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देणार (मत्तय १६:२६). ह्या कारणास्तव जर पृथ्वीवर एखादी वस्तू मौल्यवान आहे ती वस्तू म्हणजेच मनुष्याचा आत्मा होय. कारण सर्वकाही नाशवंत आहे, केवळ मनुष्याच्या आत्मा हाच अमर आहे. कारण मनुष्याचा आत्मा परमेश्वराचे स्वरूप आहे. कारण प्रारंभी देवाने

मनुष्याला आपल्या स्वरूपाचे बनवले होते. ना केवळ मनुष्याला देवाने आपल्या स्वरूपाचे पण आपल्या प्रतिरूपाचेच बनवले होते पण शास्त्रात असे लिहिले आहे की, देवाने मनुष्याला आपल्या समानतेनुसार बनवले म्हणजेच सुरवातीला मनुष्य परमेश्वराप्रमाणेच पवित्र व शुद्ध होता. म्हणजेच त्याच्यामध्ये पाप नव्हते. पण पाप करून मनुष्याने स्वत:ला अशुद्ध आणि अपवित्र बनवून घेतले आणि ह्याप्रकारे त्याने स्वत:ला देवापासून वेगळे केले. परंतु परमेश्वराचा धन्यवाद असो की त्याने आपल्या शब्दाला मनुष्य बनवून पृथ्वीवर पाठवले आणि त्याला आमच्या पापाचा दंड देवून आम्हाला पापापासून मुक्ती देवून आपल्याजवळ येण्याचा एक मार्ग दिला.

परंतु देवाला जे करायचं होते तेच त्याने केले आणि आता आपले कर्तव्य आहे की आम्ही त्याचे ऐकून त्याचे मानावे. म्हणजेच त्याच्या सुवार्तेला मानावे आणि त्याच्या आज्ञेद्वारे जीवन जगावे.

ooo

कोणत्या मार्गावर चालल्याने आम्ही परमेश्वराजवळ जावू शकतो ?"मार्ग" येशू ख्रिस्ताने म्हटले होते, मी आहे कारण तो म्हणजेच येशू ख्रिस्त देवाकडून आला होता तो देवाचा शब्द होता. तो देव होता तो स्वत: स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता आणि त्याने भूतलावर एका मनुष्यरूपात येवून आपले स्वत:चे बलीदान देऊन साऱ्या मानवजातीच्या पापाचे प्रायश्चित्त केले आणि ह्यामुळेच त्याने म्हटले होते की 'मार्ग' मी आहे. माझ्याद्वारे प्रत्येक मनुष्य परमेश्वराजवळ जावू शकतो. कारण की तो सर्व जगाच्या पापाचे प्रायश्चित्त आहे.

# मला सुवार्तेची लाज वाटत नाही

**फ्रान्सिस डेविड**

मित्रांनो, तुम्ही कधी ह्या गोष्टीवर विचार केला आहे का ? कि मी पुन्हा पुन्हा या रेडिओच्या माध्यमातून तुम्हाला मसीहा, ख्रिस्ताची सुवार्ता का सांगत आहे? आज अंदाजे पंचवीस वर्षाहूनही अधिक वर्ष झाली आहेत तरी आजही मी तुम्हाला तीच सुवार्ता सांगत आहे. जी सुवार्ता मी तुम्हाला पंचवीस वर्षापूर्वी सांगितली होती. वास्तविक पाहता जी सुवार्ता मी तुम्हाला पंचवीस वर्षापासून सांगत आहे ती दोन हजार वर्षापूर्वीची आहे. मागील दोन हजार वर्षामध्ये हजारो आणि लाखो लोकांनी ह्याच सुर्वातेचा संपूर्ण जगामध्ये प्रसार केला आहे. आणि आज सुद्धा करत आहे आणि आजही लाखो आणि करोडो लोकांनी ही सुवार्ता ऐकून त्यावर विश्वास ठेवला आहे आणि हे संपूर्ण जगाने मान्य केले. परंतु का ह्या सुर्वातेचा प्रसार केला जात आहे?

तुम्हाला माहिती आहे काय? की ह्या पंधरा मिनिटाच्या कार्यक्रमासाठी रेडिओ माध्यमातून तुम्हापर्यंत प्रसारित करण्याकरिता काही हजार रुपये खर्च होतो? परंतु ही धनसंपत्ती कोठून येते? आपल्यासारखे अनेक गरीब लोक, पुष्कळ विधवा आणि लहान-सहान काम करणारे लोक ज्यांनी समाजामध्ये इकडून-तिकडून ही सुवार्ता ऐकून तिला मान्य

केले. तेच लोक ह्या सुवार्तेला दुसऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी आपल्या मिळकतीतून काही ना काही ह्या सुवार्तेच्या प्रसारासाठी पैशांची मदत करीत आहे. परंतु ते लोक असं का करीत आहेत? एवढ्या साऱ्या पैशांनी गरीब लोकांना अन्न, वस्त्र व निवारा हे नाही देवू शकत का ? की ह्या पैशांनी दुष्कळसे दवाखाने आणि शाळा काय आपण उघडू शकत नाही काय? होय, ह्याप्रमाणे पैसा एकत्र करून ह्याप्रकारे पुष्कळसे दान-धर्माचे काम करू शकतो. परंतु प्रश्न हा आहे की काय ह्या प्रकारचे कामे करून कोणत्याही एक आत्म्याला नरकाच्या शिक्षेपासून त्याला वाचवू शकते काय?

परमेश्वराच्या वचनाच्या पुस्तकामध्ये म्हणजेच बायबलमध्ये एका ठिकाणी आपण ह्या प्रकारे वाचतो की जेव्हा एकदा येशू ख्रिस्त जात होते तेव्हा ते जाता-जाता त्याच्यामागे खूप लोक येत हाते. त्या सर्वांना येशूने वचने सांगितली आणि नंतर येशू आपल्या शिष्यगणांना म्हणाले, "ह्या लोकांना खावयास द्या. परंतु शिष्यांनी ही आज्ञा ऐकताच ते थक्क झाले कारण की ते लोक पाच हजारापेक्षाही जास्त होते, पण त्या लोकांच्या गर्दीमध्ये एक मुलगा होता. तो कामाला जाण्यासाठी घरातून निघाला असावा. त्या मुलाजवळ जेवण्यासाठी पाच भाकरी आणि दोन मासळ्या होत्या. प्रभू येशूने त्या मुलाजवळचे ते जेवण घेतले आणि आपल्या शिष्यांना आज्ञा केली की लोकांना जेवायला बसवा आणि प्रभू येशूने आकाशाकडे वर पाहून त्या भाकरीवर आशीर्वाद मागितला आणि देवाचे उपकार मानले आणि नंतर त्या भाकरी व मासळ्या शिष्यांना दिल्या आणि सांगितले लोकांना खावयास द्या आणि आश्चर्याची गोष्ट ही आहे की ते भोजन वाटत जात होते आणि लोक ते खात होते आणि लोक खावून तृप्तपण झाले तरीही त्या पाच भाकरी व दोन मासळ्या संपल्या नाहीत तर जेवण संपल्यानंतर शिष्यांनी भाकरीने भरलेल्या बारा टोपल्या जमा केल्यात. ज्या लोकांनी ते प्रात्यक्षिक पाहिले त्यांना खूपच आश्चर्य वाटले आणि ते सर्व लोक प्रभू येशूचे आभार मानणार होते. परंतु त्यांच्या आभाराची प्रभूला

आवश्यकता नव्हती म्हणून ते त्या ठिकाणाहून निघून गेले.

परंतु ह्या गोष्टीची समाप्ती येथेच होत नाही आणि समोर असे लिहिले की जेव्हा दुसरा दिवस आला तेव्हा सर्व लोक प्रभू येशूला शोधू लागले आणि ज्यावेळी प्रभू येशू त्यांना दिसले तेव्हा लोकांनी प्रश्न केला. आम्ही तुमचा शोध करीत होतो. तुम्ही कोठे गेले होते ? परंतु प्रभुला माहिती होते की ते लोक का आपला शोध घेत आहे म्हणून प्रभूनी त्यांना उत्तर देतांना म्हणाले की, ''नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका; तर पिता जो देव ह्याने ज्याच्यावर शिक्का मारला आहे. मनुष्याचा पुत्र तुम्हाला सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न देईल त्यासाठी श्रम करा. (योहान ६:२७)

मित्रांनो, ह्या गोष्टीवर लक्ष द्या की प्रभूने त्यांना नंतर जेवायला दिले नाही तर त्यांना उपदेश करून सांगितले की, तुम्ही पृथ्वीवरील शारीरिक अन्नाविषयी चिंता करणे सोडून द्या तर सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न मिळवण्याची खटपट (प्रयत्न) करा. कारण पृथ्वीवरील शारीरिक अन्न हे नाशवंत आहे पण वास्तविक पाहता मनुष्याला त्या सार्वकालीक अन्नाचीच आवश्यकता आहे. जे अन्न स्वर्गीय आहे ते अन्न आत्म्यासाठी आहे आणि ते अन्न आत्मिक आहे. परंतु जोपर्यंत मानवाचा प्रश्न आहे तो तर केवळ त्याच गोष्टीचा शोध करतो आणि केवळ त्याच गोष्टी प्राप्तीसाठी झटत असतो आणि त्याच गोष्टीवर मन लावतो की ज्या शारीरिक आहे. मनुष्याचे लक्ष तर त्याच अन्नाला प्राप्त करण्यासाठी असते, ज्या अन्नाद्वारे आपल्या शरीराला शक्ती प्राप्त होते. त्याचे लक्ष केवळ शारीरिक आरोग्याकडे लागलेले असते. त्याला आत्म्याची काहीच चिंता नाही कारण तो आपल्या आत्म्याविषयीचे महत्त्व ओळखत नाही. परंतु परमेश्वराने ज्या मनुष्याला बनवले आहे ज्याने मनुष्याला जीवन दिले आहे तो ही गोष्ट पूर्णपणे जाणतो की मनुष्याचे शरीर हे नाशवंत आहे पण त्याचा आत्मा अमर आहे. ह्यासाठी त्याला मनुष्याच्या शरीराची एवढी नाही परंतु आत्म्याची

काळजी आहे. मनुष्याच्या शरीरासाठी परमेश्वराने वेगवेगळे अन्नसामग्री बनवली आहे. परंतु मनुष्याच्या आत्म्याला पापामुळे नरकात जावून नाश होण्यापासून वाचवण्यासाठी त्याने आपल्या स्वत:च्या सामर्थ्यवान वचनाला एका मनुष्य रूपात जगामध्ये पाठवावे लागले आणि तो मनुष्य म्हणजे येशू ख्रिस्त होता. प्रभूने स्वत: म्हटले की देवाने जगावर एवढी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होवू नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे (योहान ३:१६). देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला क्रूसावर एका अपराध्याप्रमाणे मरण्यासाठी पाठवले होते आणि जेव्हा परमेश्वराकडून वेळपूर्ण झाली तेव्हा परमेश्वराने होवू दिले की त्याचा पुत्र निर्दोष असताना एका अपराध्याप्रमाणे धरल्या जावा आणि खोट्या साक्षीदारांनी दोष आरोप करून त्याला (अपराधी) दोषी ठरवावे आणि त्या समयानुसार एका क्रुसावरती टांगून मारावे. जेव्हा हे काम परमेश्वराच्या इच्छेनुसार झाले तेव्हा मेलेला येशूला कबरेमध्ये पुरल्या गेले पण हे असंभव होते की परमेश्वराचा पुत्र मनुष्यासारख्या कबरेमध्ये पुरून राहणे. म्हणून परमेश्वराच्या सामर्थ्याने तो तिसऱ्या दिवशी जिवंत झाला आणि स्वर्गारोहणापूर्वी त्याने आपल्या शिष्यांना ही आज्ञा दिली होती की, तुम्ही जावून संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा की, माझ्या बलीदानामुळे संपूर्ण जगाच्या पापाचे प्रायश्चित्त केले आहे आणि जो ऐकून विश्वास ठेवील आणि पश्चात्ताप करील आणि आपल्या पापाची क्षमा होण्यासाठी बाप्तीस्मा घेईल त्याला त्याच्या पापापासून मुक्तता आणि तारण मिळेल. (मत्तय २८:१९-२० मार्क १६:१५-१६, लुक २४:४६-४७, प्रेषित २:३७-३८)

आणि हेच कारण आहे मित्रहो की एकवेळेस पुन्हा मी आपल्याला तीच सुवार्ता सांगत आहे. कारण मला माहीत आहे की, आपल्याला आणि साऱ्या जगाला ह्याची गरज आहे. पण न केवळ

सुवार्ता ऐकणेच जरूरी आहे. हे पण आवश्यक आहे की ऐकणाऱ्याने त्यावर विश्वास ठेवावा आणि तिला मान्य करावे आणि माझी इच्छा आहे की तुम्ही असेच कराल. कारण जेव्हा परमेश्वराने एक असे विशाल कार्य केले आहे तर काय आम्ही त्याच्या अनुग्रहाला व्यर्थ ठरवावे?

ooo


आम्ही तुमचा शोध करीत होतो. तुम्ही कोठे गेले होते? परंतु प्रभुला माहिती होते की ते लोक का आपला शोध घेत आहे म्हणून प्रभूनी त्यांना उत्तर देतांना म्हणाले की, ''नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका; तर पिता जो देव ह्याने ज्याच्यावर शिक्का मारला आहे. मनुष्याचा पुत्र तुम्हाला सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न देईल त्यासाठी श्रम करा.

(योहान ६:२७)

# उपासना

## उपासनेचा अर्थ

**जॉन ओ'नील**




उपासना याचा अर्थ असा होतो की, सेवा (दास), स्तुति (प्रशंसा) सन्मान (आदर) गौरव (महिमा) व भक्ती, उपासना ही खऱ्या प्रकारे होण्यासाठी एक चांगल्या व्यक्तीद्वारे होण्याची गरज आहे. ती खऱ्या मनापासून केली पाहिजे.

१) आम्ही सेवेच्या द्वारे उपासना करू शकतो -

या ठिकाणी सेवा याचा अर्थ आहे मदत करणे, आज्ञा पाळणे, काम करणे, आराधना करणे इत्यादी व परमेश्वराच्या मुलाविषयी बायबल सांगते की, एक दास आहे आणि त्याचा स्वामी प्रभू आहे. अनेक वेळा पौलस स्वत: प्रभूचा दास म्हणून घेतो, संबोधित करतो. (रोम १:१) पेत्र व याकोब यांनी पण २ पेत्र १:१ व याकोब १:१ मध्ये सुद्धा स्वत:ला प्रभू येशू ख्रिस्ताचा दास म्हणून संबोधित केले.

याचा अर्थ काय? सर्व काही प्रभूला ख्रिस्ताला समर्पित करून त्याची सेवा करीत राहणार आणि तसेच आम्हाला पण करायचे आहे. पौलस एका ठिकाणी म्हणतो की, "परंतु आता तुम्ही पापापासून मुक्त होऊन देवाचे दास झाल्यामुळे तुम्हास पवित्रीकरणाची फलप्राप्ती झाली आहे आणि सर्वकालचे जीवन हे उद्दिष्ट मिळाले आहे." (रोम ६:२२)

**आता ही गोष्ट पाहण्याकरिता प्रभूला कोणत्या प्रकारची सेवा पाहिजे खालील वचनावरून पाहू या.**

प्रेषित २० : १९ - रोम १४:१६-१९, रोम १२:११, रोम १२:१, इफिस ६:७ प्रगटी २:१९.

तर आम्ही उपासनेला, उपासनेची सेवा म्हणून संबोधित करतो तर ते खरे आहे कारण आपण प्रभूची सेवा करत आहो. दुसऱ्या शब्दात आमचे संपूर्ण जीवन प्रभूच्या सेवेत व्यतीत होत आहे आणि अशाप्रकारे आमचे संपूर्ण जीवन त्याच्या उपासनेत व्यतीत होत आहे आणि जर आम्ही त्याच्या आज्ञेप्रमाणे चालत नाही तर आम्ही कसे म्हणू शकतो की आम्ही त्याची उपासना करत आहे.

आम्ही स्तुतीच्या द्वारे प्रभूची उपासना करू शकतो. प्रे.कृ. १६:२५ जेव्हा पौलस व सीलास बंदिगृहात होते तेव्हा असे लिहिले, "मध्य रात्रीच्या सुमारास पौल व सीला हे प्रार्थना करीत असता व गाणे गाऊन देवाची स्तुती करीत असता बंदिवान त्याचे ऐकत होते. पुन्हा एका वचनात लिहिले आहे की, प्रभूने आम्हाला किती आशीर्वादीत केले आहे आणि त्याच्या प्रती आमचे काय कर्तव्य आहे. पौल म्हणतो की, "ह्यासाठी की, ज्या आम्ही ख्रिस्तावर पूर्वीच आशा ठेविली होती त्या आम्हाकडून त्याच्या गौरवाची स्तुती व्हावी" इफिस १:१२. मग आम्ही असे वाचतो की, "म्हणून त्याचे नाव पत्करणाऱ्या 'ओठांचे फळ' असा स्तुतीचा यज्ञ आपण त्याच्याद्वारे नित्य अर्पण करावा (इब्री १३:१५). पेत्र अशाप्रकारे लिहितो की, "ह्यासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करितात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरेण ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस

प्रशंसा गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावे. (१ पेत्र १ :७)

भाषण करणाऱ्याने आपण देवाची वचने बोलत आहो असे बोलावे. सेवा करणाऱ्याने ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करीत आहो अशी करावी. ह्यासाठी की, सर्व गोष्टीत देवाचे गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावे. गौरव व पराक्रम ही युगानुयुग त्याची आहेत. आमेन (१ पेत्र ४:११).

आम्हाला प्रभूची स्तुती प्रत्येक दिवशी आपल्या कामाद्वारे, बोलण्या चालण्याद्वारे करायला पाहिजे. विशेष करून प्रभूच्या उपासनेच्या दिवशी आम्ही एकत्र होतो तेव्हा आमचा उद्देश असायला पाहिजे की, आम्ही त्याची स्तुती करू. आमच्या उपस्थितीद्वारे आम्ही स्तुती आणि जेव्हा आम्ही उपासनेसाठी एकत्र येवू त्यावेळेस आम्ही नम्रतेने यायला पाहिजे तसेच शास्त्रअभ्यास करणे, प्रार्थना करणे, गीत गाणे, वर्गणी देणे आणि प्रभू भोजनात भाग घेण्याद्वारे आम्ही त्याची स्तुती करू शकतो, प्रशंसा करू शकतो आणि जर असे आम्ही करत नाही तर कशाप्रकारे आम्ही प्रभूची स्तुती करणार ?

**आम्ही प्रभूचा (आदर) सन्मान करून त्याची उपासना करू शकतो -**

योहान ५:२३ मध्ये प्रभू येशूने असे म्हटले, ''ह्यासाठी की, जसा पित्याचा सन्मान करितात त्या पुत्राचाही सन्मान सर्वांनी करावा जो पुत्राचा सन्मान करीत नाही.'' तो ज्याने मला पाठविले, त्या पित्याचा सन्मान करीत नाही. तसेच आपण पाहू शकतो की, (१ पेत्र १ :७) ''ह्यासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यास कारणीभूत व्हावे.'' तसेच पौल लिहितो (१तिमथी १:१७) जो सनातन, अविनाशी अदृश्य राजा असा एकच देव त्याला सन्मान व गौरव युगानुयुग असो, आमेन. आम्हाला प्रभूचा सन्मान करावयाचा आहे. कारण त्याने आमचा उद्धार केला, आम्हाला आशीर्वादीत केले व एक चांगले उत्तम जीवन जगण्याची आशा दिली म्हणून त्याचा सन्मान करू या.

**आम्ही त्याचे गौरव (महिमा) करून त्याची उपासना करू शकतो -**

गौरव करणे याचा अर्थ होतो की, मोठेपणा देणे, आदर करणे, सन्मान करणे, स्तुती करणे याचा अर्थ असा की उपासना करणे जे की आपण सुरूवातीलाच पाहिले (रोम १५:६) आता तुम्ही एकतेने व एकमुखाने आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा जो पिता आणि देव त्याचे गौरव करावे म्हणून धीर व उत्तेजन देणारा देव असे करो की ख्रिस्त येशूप्रमाणे तुम्ही परस्पर एकचित व्हावे.

(१ ले करिंथ ६:२०) मध्ये असे म्हटले आहे, "कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा. ह्यास्तव तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा.

(१ ले पेत्र ४:१६) ख्रिस्ती या नात्याने कोणाला दु:ख सहन करावे लागत असेल तर त्याला लाज वाटू नये त्या नावामुळे देवाचे गौरव करावे.

आपल्या जीवनात अशीच इच्छा असायला पाहिजे की, स्वत:ची स्तुती व मोठेपणा विसरून आपण प्रत्येक गोष्टीत परमेश्वराला उंचवयाला पाहिजे. त्याची स्तुती व गौरव करून त्याच्या तुलनेत आम्ही धूळ आहो, माती आहोत तरी प्रभू वारी आम्ही अशासाठी एकत्रित जगतो की आम्ही आमची मने पूर्णपणे त्याच्याकडे लावून त्याची उपासना करावी.

**आम्ही प्रभूची उपासना त्याच्या प्रती आपल्या भक्तीद्वारे प्रकट करू शकतो -**

परमेश्वर आमचा निर्माणकर्ता व प्रभू येशू ख्रिस्त आमचा उद्धारकर्ता आहे. आम्ही त्याचे ऐकायला पाहिजे. आम्हाला त्याच्या आज्ञा पाळल्या पाहिजे. लीनतेने व नम्रतेने आम्ही त्याची भक्ती केली पाहिजे. कारण दाविद लिहितो, "त्याचे नाम पवित्र व भययोग्य आहे." (स्तोत्र १११:९)

तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येत आहे. किंबहुना आलीच आहे, कारण आपले

उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे. (योहान ४:२३)

"देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे. योहान ४:२४, परंतु आपल्या मनाने व आत्म्याने तेव्हा भक्ती करू शकतो, जेव्हा आम्ही खऱ्या अंतकरणाने लीन नम्र होवून मनापासून त्याची उपासना करतो. तेव्हा आम्ही पौलाने सांगितलेली गोष्ट चांगल्याप्रमारे समजू शकतो की, "बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल ते सर्व प्रभूच्या नावाने करा आणि त्याच्याद्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा." (कलस्सै ३:१७)


अनेक लोक उपासनेला अशा करिता जातात की ती त्याची सवय पडलेली असल्यामुळे काही लोक उपासनेच्या नियमाचे पालन करावे लागते म्हणून मंडळीत येतात किंवा आपणाला कोणीतरी सांगतात किंवा बोलतात म्हणून उपासनेला जातात पण त्यांना उपासनेचा अर्थ समजेला नसतो पण अशामुळे त्यापासून त्यांना काहीच लाभ होत नाही.

पण आता आपण जेव्हा उपासना करणार तर संपूर्ण मनाने स्वच्छ अंत:करणाने, लीन व नम्र भावनेने खऱ्या मनाने परमेश्वराची उपासना करून देवाला मान, महिमा, गौरव व स्तुती देऊ या.

०००

**देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.**

**योहान ४:२४**



# सर्वकाही प्रभूच्या नावात करा

**- डेविड एंगुईश**

**ता**रण ''प्रभूच्या नावात''...

ख्रिस्ती विश्वासाच्या गोष्टीत तसेच व्यवहाराच्या संबंधामध्ये येशूजवळ पूर्ण अधिकार आहे. आपल्या पित्याजवळ वर उचलण्या आधी, त्याने सांगितले होते की, ''स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे'' (मत्तय २८:१८). येशू आणि त्याच्या शिष्यांना या गोष्टीची माहिती होती की जर ते लोकांना, त्या तारणाला मानण्यासाठी सांगायला जात आहेत जे केवळ त्याच्याचद्वारे मिळते तर सांगणे आवश्यक होते. त्यांनी तारणासंबंधी आणखी सांगितले की, येशू नावात अर्थात त्याच्या अधिकाराने सार्वकालिक जीवन कसे प्राप्त होऊ शकते.

सर्व अधिकार असल्याचा दावा केल्यानंतर येशूने आपल्या शिष्यांना निर्देश दिले की, त्या अधिकाराला कसे मानायचे आहे.

''तेव्हा येशूजवळ येऊन त्यांच्याशी बोलतांना म्हणाला, स्वर्गात

आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा. त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यास पाळावयास शिकवा आणि पाहा युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे"(मत्तय २८:१८-२०).

"तेव्हा" शब्द या वचनामध्ये पुढे येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला येशूच्या अधिकाराशी जोडतो, येथे मुख्य जोर शिष्य बनवण्यावर आहे. शिष्य बनविण्याचा तीन इतर क्रियांमध्ये अर्थात बाबींमध्ये स्पष्ट केल्या गेला आहे. जेणेकरून मुख्य क्रियेची माहिती मिळते. येशूच्या शिष्यांना जाऊन, पिता. पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा देणे आणि सर्व गोष्टींना पाळावयास शिकवणे होते, ज्याची येशूने आज्ञा दिली होती. येशू ज्याच्याजवळ सर्व अधिकार आहे, त्याने त्यांना हे सर्व करायला सांगितले होते. शिष्य बनविण्याचा त्याचे प्रयत्न होते.

येशूचे अधिकार आणि तारणाच्या योजनेत हे संबंध नव्या करारातील इतर वचनामध्ये मिळतात. वधस्तंभावर दिल्या जाण्याच्या रात्री आपल्या शिष्यांना निरोपाच्या समयी शिक्षणात येशूने आव्हान केले होते की, परमेश्वराजवळ पोहचण्याचा एकमात्र मार्ग केवळ तोच आहे. "येशूने त्याला म्हटले मार्ग, सत्य व जीवन मीच आहे. माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही" (योहान १४:६). पौलाने करिंथच्या लोकांना सांगितले होते की, तो आणि त्याच्याबरोबर काम करणारे लोक ख्रिस्ताचे वकील आहेत. "म्हणून देव आम्हाकडून विनवीत असल्यासारखे आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकीली करितो, देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हा, अशी आम्ही ख्रिस्ताच्या वतीने विनंती करितो" (करिंथकरास दुसरे पत्र ५:२०). परमेश्वराला ग्रहण करून तारण पावण्याचा आग्रह करा. संभवता येशूच्या अधिकाराचे सर्वात संपूर्ण वाक्य प्रेषितांची कृत्ये ४ अध्यायामध्ये मिळते, जेथे पेत्राने एका लंगड्या मनुष्याला बरे केल्यावर

येशूच्या शिक्षणाचे स्पष्टीकरण दिले होते.

"तेव्हा पेत्र पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्यांना म्हणाला, अहो लोकाधिकाऱ्यांनो व वडील जणांनो एका दुर्बल मनुष्यावर कसा उपकार झाला म्हणजे तो कशाने बरा झाला याविषयी आमची आज चौकशी व्हावयाची असेल तर तुम्हा सर्वांना व इस्त्राएल लोकांना हे कळावे की, ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले ज्याला देवाने मेलेल्यातून उठविले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे. तुम्ही बांधकाम करणाऱ्यांनी तुच्छ मानलेला जो दगड कोनशिला झाला तो हाच आहे आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही" (प्रेषितांची कृत्ये ४:८-१२).

पेत्र मंदिरामध्ये एका लंगड्या भिकाऱ्याला केवळ यासाठी बरे करू शकला पहा प्रेषितांची कृत्ये ३:१-१०. कारण येशूने त्याला असे करण्यासाठी अधिकृत केले होते आणि त्याला असे करण्यासाठी सामर्थ्य दिले होते. जी गोष्ट त्या चमत्कारासाठीही सत्य होती. तिच त्याच्यानंतर दिल्या जाणारी तारणाच्या शिक्षणासाठीही सत्य होती (प्रेषितांची कृत्ये ३:११-१६). नंतर प्रेषितांची कृत्ये ४:१-२२ चा वास्तविक आरोप पेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या कामावर नाही; परंतु येशूच्या अधिकाराच्या विषयी होता. येथे आम्ही (मत्तय २८:१-२०) चा नियम लागू होणे पाहतो. प्रेषितांद्वारे ज्या तारणाचे आमंत्रण केल्या जात होते ते त्यांच्या स्वत:कडून दिल्या जाणारे अभिवचन नव्हते परंतु येशूच्या नावात अर्थात ख्रिस्ताच्या अधिकाराने दिल्या जाणारे अभिवचन होते.

प्रेषितांची कृत्यांमध्ये पेत्राने त्याच्या प्रवचनाला सकारात्मक रूपाने मानणाऱ्यांना सांगितले, "पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापाची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येकजण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या" (प्रेषितांची कृत्ये २:३८). प्रेषितांची कृत्ये तिसऱ्या अध्यायात जेव्हा एका

लंगड्या मनुष्याला बरे केले गेले होते. (जे प्रेषितांची कृत्ये चवथा आणि पाचवा अध्यायाच्या भांडणाचे कारण झाले.) तर पेत्राने त्याला म्हटले नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लागे" (प्रेषितांची कृत्ये ३:६). पेत्र आणि योहान यांचा छळ करणाऱ्या यहुदी निरीक्षकांना या गोष्टीची माहिती होती की ते येशूच्या अधिकाराविषयी काय म्हणत आहेत. त्यांनी प्रेषितांना आदेश दिला की, "मग त्यांनी त्यांना बोलावून असे निक्षून सांगितले की, येशूच्या नावाने अगदी बोलू नका अथवा शिकवूही नका" (प्रेषितांची कृत्ये ४:१८, पहा ५:४०). या छळाच्या नंतर या समयानंतर जेव्हा शिष्य प्रार्थना करण्यास एकत्र झाले तर त्यांची प्रार्थना हीच होती की, तुझा पवित्र सेवक येशू याच्या नावाने चिन्हे व अद्भूते घडावी असेही कर (प्रेषितांची कृत्ये ४:३०).

नवजात मंडळी वाढून रोमी साम्राज्यात पसरल्या जावून येशूच्या अधिकाराचे आकर्षण सदोदीत राहिले. प्रेषितांची कृत्ये आठव्या अध्यायात फिलिप्पाद्वारे शोमरोनमध्ये सुवार्ता सांगितल्यानंतर त्याने तसेच म्हणजे प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्मा घेण्यासाठी सांगून पेत्र आणि अन्य शिष्यासारखेच केले(प्रेषितांची कृत्ये ८:१६). प्रेषितांची कृत्ये नवव्या अध्यायामध्ये जेव्हा बर्णबा त्याला घेऊन प्रेषितांकडे आला आणि त्याला वाटेत प्रभूचे दर्शन कसे झाले प्रभू त्याच्याबरोबर कसा बोलला आणि येशूच्या नावाने दिमिष्कांत "त्याने धैर्याने कसे भाषण केले हे सर्व त्याने त्यांना सांगितले" (प्रेषितांची कृत्ये ९:२७).

प्रेषितांची कृत्ये दहा आणि अकरा या अध्यायामध्ये येशूच्या अधिकाराचा प्रश्न यापेक्षा महत्त्वपूर्ण झाला. जेव्हा पहिल्या वेळेस सुवार्ता ऐकणे आणि मानणारे लोक अन्यजातीचे होते. त्यांना तारणाचा आमंत्रण करण्याचा पेत्राला काय अधिकार होता? तो एक यहुदी होता आणि गैर यहुदीयांशी काहीच संबंध ठेवत नव्हता आणि "ज्याने कधीच अपवित्र वस्तू खाल्ली नव्हती." (प्रेषितांची कृत्ये १०:१४ पहा वचन २८). तो कर्नेल सारख्या अन्य जातीवाल्याशी कशी सहभागीता करू शकत होता?

यरूशलेमच्या मंडळीच्या काही लोकांनी हे ऐकून की पेत्राने काय केले होते हाच प्रश्न केला. (प्रेषितांची कृत्ये ११:१-१८). याचे उत्तर प्रेषितांची कृत्ये १०:४४-४६ या वचनात मिळते. पवित्र आत्मा कर्नेल आणि त्याच्या घराण्यावर उतरला होता. ज्याकडून ते अन्य भाषा बोलू शकले. हे तसेच होते जसे प्रेषितांची कृत्ये याच्या दुसऱ्या अध्यायामध्ये प्रेषितांबरोबर झाले होते. हे पाहून पेत्राला समजले की, परमेश्वर अन्य जातीमध्ये काम करत आहे. या कारणाने कोणाला त्यांचा बाप्तिस्मा झाल्यावर त्यांना मंडळीत मिळवून घेण्यास थांबवायचे नव्हते. (वचन ४६,४७). यासाठी "येशू ख्रिस्ताच्या नावात त्याचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्याने आज्ञा केली तेव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली" (वचन ४८).

येशूच्या अधिकाराने पौल सुवार्तेला रोमी साम्राज्याच्या अन्य जाती जगापर्यंत घेऊन गेला. चमत्कार करत आणि लोकांना तारण मिळावे म्हणत फिलिप्पेमध्ये त्याने एका मुलीमधून भूताला हे म्हणत काढले की, "येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तुला आज्ञा करितो की, तू हिच्यामधून निघून जा, आणि तो तात्काळ निघून गेला"(प्रेषितांची कृत्ये६:१८). प्रेषितांची कृत्ये १९ व्या अध्यायात त्याला असे लोक ज्यांना योहानाच्या बाप्तिस्म्यामध्ये बुडविले होते, परंतु ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्यामध्ये नाही आणि हे समजावल्यावर त्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला. (वचन ५ख.) करिंथ येथील मंडळीतील आढळणारी फुटीच्या समस्येला मिटवीत पौलाने तेथील बंधूना आठवण करून दिली की त्यांचा पौलाच्या नावात बाप्तिस्मा (करिंथकरास पहिले पत्र १:१३) झाला नव्हता. त्याने पुढे म्हटले तो या गोष्टीकडून आनंदित आहे की, त्याने त्यांच्यामधल्या कित्येकांना बाप्तिस्मा दिला नाही. कारण त्याची अशी इच्छा नव्हती की, लोक म्हणतील त्यांना पौलाच्या नावात बाप्तिस्मा दिल्या गेला आहे. (करिंथकरास पहिले पत्र १:१३-१५). त्याची इच्छा होती पाठकाने या गोष्टीवर ध्यान द्यावे की, त्यांना येशूच्या नावात बाप्तिस्मा दिला गेला आहे. नंतर करिंथ येथील

लोकांना लक्ष द्यायला सांगून त्यांना त्यांच्या जगातील पापपूर्ण स्थितीमधून काढल्या गेले आहे. आठवण दिली की येशूच्या अधिकाराला मानण्यासाठी त्यांनी काय केले होते. त्याने लिहिले, "आणि तुम्हापैकी कित्येक तसे होते, तरी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेले असे झाला" (करिंथकरास पहिले पत्र ६:११).

पौलाने स्पष्ट केले की, विश्वासू म्हणणाऱ्यांना येशूच्या नावाशिवाय कोणत्याही दुसऱ्या अधिकाराच्या खाली काम करण्याचा काही अधिकार नाही. जरी केफा (पेत्र) असो, अपुल्लोस असो किंवा पौल जरी असला तरीही (पहा) (करिंथकरास पहिले पत्र १:१०-१३). जर त्यांना त्या प्रसिद्ध लोकांच्या नावाला घेण्याची मनाई होती, तर आज लोक कोणत्या अधिकारांना मनुष्याचे नाव आपल्या नावासोबत जोडत आहेत?

सुरवातीचे ख्रिस्ती लोक येशूच्या अधिकाराविषयी गंभीररूपाने सावध होते. त्यांना येशूद्वारा या गोष्टी शिकवायला आज्ञा दिली होती. जी स्वर्गात बांधलेली आणि स्वर्गात मोकळी केली होती. (मत्तय १६:१९,१८:१८, २८:१९-२०) हे दाखविण्यासाठी ते जे काही म्हणत होते ते त्यांच्या स्वीकृतीशी होते आणि त्यांना आवश्यक सामर्थ्य दिल्या गेले होते (पहा इब्रीलोकास पत्र २:३,४) त्यांनी आपल्या नाही परंतु त्याच्याच अधिकाराने तारणाची घोषणा केली.

• • •

"आणि तुम्हापैकी कित्येक तसे होते, तरी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेले असे झाला" (करिंथकरास पहिले पत्र ६:११)

# शांती तर शांती देण्यानेच मिळेल

**- टॉम हॉलेंड**

**श**ब्दांमध्ये दोन प्रकारची क्षमता असते, जखमांना ताजे करण्याची आणि त्यांना भरण्याची. पवित्र शास्त्रामध्ये जखम भरण्याचा शब्द आहे, ''शांती''. नव्या करारात या शब्दाचा उपयोग पुष्कळदा मिळतो. या शब्दाचा अक्षरश: अर्थ आहे ''च्या जवळ बोलावणे'' (करिंथकरास दुसरे पत्र १:३,४, ७:१३). सात्वना, सहायता, धाडस, ताजे होणे, सांभाळणे इत्यादी याचे मिळतेजुळते शब्द आहेत.

अधिकतर लोकांना जीवनामध्ये काही वेळेस शांतीची आवश्यकता असते. दु:ख आणि त्रास सर्वांच्याच जीवनात येतात. जीवनामध्ये दु:ख आणि निराशेचा सामना करणे हा पण एक आशीर्वाद आहे. कारण याकडून व्यक्ती त्या लोकांना शांती देण्यासाठी मानसिक रीतीने तयार होतो जे त्याला दु:खी दिसतात.




प्रेषित पौल याप्रकारे म्हणतो की, ''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता, जो करूणाकार पिता व सर्वसांत्वनदाता देव, तो धन्यवादित असो, तो आमच्यावरील सर्व संकटात आमचे सांत्वन करितो असे की ज्या सांत्वनाने आम्हाला स्वत: देवाकडून सांत्वन मिळते

त्या सांत्वनाने आम्ही जे कोणी कोणत्याही संकटात आहोत त्याचे सांत्वन करावयास समर्थ व्हावे" (पौलाचे करिंथकरास दुसरे पत्र १:३,४).

परमेश्वर आपल्या वचनाच्याद्वारे आम्हाला शांती देतो. (पौलाचे थेस्सलनीकारांस पहिले पत्र ४:१८) जर आपण ऐकतो तर परमेश्वर आपल्यावर प्रेम करेल. (रोमकरास पत्र ८:३८,३९). परमेश्वर आमच्याशी करार करतो की,तो आम्हाला परीक्षेत अपयशी होऊ देणार नाही (करिंथकरास पहिले पत्र १०:१३). परमेश्वराने आमच्याबरोबर राहण्याची प्रतिज्ञा केली आहे (इब्री लोकास पत्र १३:५,६). दिवस असो की रात्र असो, कोणत्याही समयी आपण परमेश्वराच्या सिंहासनापर्यंत पोहचू शकतो.

परमेश्वर आपल्या लोकांद्वारे आम्हाला शांती देतो (करिंथकरास दुसरे पत्र १:४). परमेश्वराच्या लोकांच्या मनात दुसऱ्यांसाठी चिंता तसेच प्रेम आहे. या कारणाने ते त्या लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतात. जे कोणत्याही प्रकारच्या दु:खात आहेत त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांना सांत्वना देतात, त्यांचे धाडस बांधतात आणि त्यांची सहाय्यता करतात आणि त्यांच्यावर प्रत्येक प्रकारे लक्ष ठेवतात.

• • •



# तुम्ही येशूबरोबर काय कराल ?

- सनी डेविड

**या** आपण या धड्याची सुरूवात लूक १९ या अध्यायामध्ये मिळणाऱ्या घटनेशी करत आहोत. ज्यामध्ये आपण जक्कय नावाच्या व्यक्तिविषयी वाचतो. या आधी आपण अध्याय १८ मध्ये वाचतो की येशूने आपल्या शिष्यांना घेऊन येरूशलेमेला जाण्याची योजना बनविली होती आणि जेव्हा तो जात होता तर मार्गामध्ये त्याने एका आंधळ्याला दृष्टिदान दिले होते. ह्या परिणामामुळे अनेक त्याकडे आकर्षित झाले. आम्ही नंतर आपण वाचतो, की ''त्याने यरीहोत प्रवेश केला व त्यातून तो पुढे जात होता तेव्हा पहा जक्कय नावाचा कोणी एक मनुष्य होता. तो मुख्य जकातदार असून श्रीमंत होता. येशू कोण आहे हे पाहण्यासाठी तो प्रयत्न करीत होता पण गर्दीमुळे त्याचे काही चालेना. कारण तो ठेंगणा होता. तेव्हा तो पुढे धावत जाऊन त्याला पाहण्यासाठी उंबराच्या झाडावर चढला. कारण येशूला त्या वाटेने जावयाचे होते. मग येशू त्या ठिकाणी येताच दृष्टीवर करून त्याला म्हणाला, जक्कया त्वरा करून खाली ये.

कारण आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे. तेव्हा त्याने त्वरेने खाली उतरून आनंदाने त्याचे आगतस्वागत केले. हे पाहून सर्व लोक कुरकूर करू लागले की, पापी मनुष्याच्या घरी हा उतरावयास गेला आहे. तेव्हा जक्कय उभा राहून प्रभूला म्हणाला प्रभुजी, पहा मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यास देतो आणि मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. येशूने त्याला म्हटले आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे. कारण हाही अब्राहामाचा पुत्र आहे. कारण मनुष्याचा पुत्र 'हरवलेले शोधावयास' व 'तारावयास' आला आहे'' (लूक १९:१-१०).

आम्ही पाहता की जक्कय जकात घेणाऱ्यांचा मुख्य होता. रोमी साम्राज्यात जकात घेणाऱ्या लोकांना फारच घृणास्पद दुष्टीने पाहिल्या जात होते. कारण जकात घेणारे लोक नेहमी कित्येक प्रकारच्या अनुचित प्रकारे लोकांकडून अधिक जकात कर, वसूल करीत होते. हेच कारण आहे की जेव्हा येशू त्याच्या घरात गेला तर लोकांना हे म्हणून त्याला बरेवाईट म्हटले की तो तर पापी मनुष्याच्या घरात गेला आहे.

जक्कय एक श्रीमंत व्यक्ती होता परंतु तो आपल्या त्या अपरंपार धनाच्या जोरावर तारण प्राप्त करू शकला असता काय ? निसंदेह तो स्वत:च्या आणि जगाच्या दृष्टीमध्ये एक श्रीमंत मनुष्य होता. त्याच्याजवळ जगाची प्रत्येक वस्तू होती, परंतु आत्मिक दृष्टिकोनातून निर्धन होता म्हणजे तो या जगात अन्य लोकांसारखा हरवलेला होता. त्याला तारणाची गरज होती आणि येशूला ही गोष्ट माहीत होती. यासाठी जेव्हा त्याने पाहिले की, जक्कयच्या मनात त्याला भेटण्याची इच्छा आहे तर प्रभूने स्वत: त्याच्या घरी जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्याला माहीत होते की जक्कय त्याचा स्वीकार करू इच्छितो, त्याला माहीत होते की जक्कय त्याच्यावर विश्वास ठेवतो. म्हणून त्याने त्याला म्हटले, कारण आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे.

जक्कयाने प्रभू येशूबद्दल फार खूप ऐकले होते. त्याने त्याच्या अनेक महत्त्वपूर्ण शिक्षणाविषयी ऐकले होते. त्याने पुष्कळशा आश्चर्यजनक कामाविषयी ऐकेले होते. तो येशूला भेटायला फार उत्सुक होता. लिहिले

आहे की, येशूला पाहू इच्छित होता म्हणून तो येशूला भेटण्यासाठी रस्त्यात एका ठिकाणी उभा राहिला. परंतु काही वेळाने त्याने पाहिले की, खूप मोठी गर्दी येशूला घेऊन येत आहे. आता तो काय करेल ? तो निराश होऊन आपल्या घरी परत जाईल? किंवा तो आपल्या मनात म्हणेल की कधीतरी नंतर चांगली वेळ पाहून येशूला भेटेन ?

मित्रांनो, जक्कय पक्क्या निश्चयाने आला होता. त्याने त्याच्या मनात निश्चय केला होता की आज तो येशूला पाहूनच घरी जाईल. म्हणून आपण पाहतो की, तेव्हा त्याला पाहायला तो पुढे धावत जावून उंबराच्या झाडावर चढला. ठेंगणा होता परंतु त्याने हिंमत सोडली नाही. त्याने पाहिले की खूप मोठी गर्दी येशूला घेरून आहे. परंतु याकडून त्याचं हृदय लहान झाले नाही. त्याला आज येशूला भेटण्यासाठी कोणीही थांबवू शकत नव्हता. त्याने आपल्या मनात पक्का निश्चय केला होता की आज त्याला येशूला पाहायचेच आहे.

आज जगात अनेक असे लोक आहेत ज्यांनी जक्कयासारखे प्रभू येशूविषयी फार काही ऐकले आहे, ते त्याच्या महत्त्वपूर्ण शिक्षणाला ओळखतात. त्यांनी प्रभू येशूच्या सामर्थी तसेच चमत्कारिक कामाविषयी ऐकले होते. त्यांनी अनेकदा ऐकले आहे की, प्रभू येशू ख्रिस्त त्यांना पापाच्या दंडापासून वाचविण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला. ते समजतात की येशू त्यांच्यासाठी वधस्तंभावर खिळला गेला. ते समजतात की येशू त्यांचा तारणारा आहे, परंतु त्यांचा व्यवहार त्या प्रधानांसारखा आहे ज्यांच्याविषयी योहान १२:४२,४३ मध्ये लिहिले आहे की असे असूनही "अधिकाऱ्यांतून देखील पुष्कळ जणांनी त्याच्यावर विश्वास ठेवला, परंतु आपण सभा बहिष्कृत होऊ नये म्हणून परूश्यांमुळे ते तसे कबूल करीत नव्हते. कारण त्यांना देवाकडील गौरवापेक्षा मानवाकडील गौरव अधिक प्रिय वाटले."

पुष्कळसे लोक प्रभूपेक्षा आपल्या स्वत:वर प्रेम करतात. ते घाबरतात की, प्रभू येशूचा स्वीकार केल्याने त्याचे मित्र किंवा संबंधी त्यांच्याशी नाराज होतील. ते घाबरतात की उघडपणे प्रभू येशूला आपला

तारणारा मानल्यावर अन्य लोक त्यांचा उपहास करितील. ते लोक समोर येऊन सर्वांसमोर येशूला आपला उद्धारकर्ता मानण्यास लाजतात परंतु जक्कयबद्दल आपण वाचतो की, तो पुढे धावत गेला आणि झाडावर चढला. कारण तो येशूला पाहू इच्छित होता.

त्याची उंची कमी होती, तो ठेंगणा होता. परंतु त्याची ही कमी येशूला पाहण्यासाठी थांबू शकली नाही. अनेक लोक आपल्या स्वत:ला आत्मिक दृष्टिकोनातून ठेंगणा किंवा लहान अनुभव करतात. ते विचार करतात की मी तर खूप पापी आहे, मी खूप पाप केले आहे, मी प्रत्येक दिवशी पाप करतो, मी यासाठी योग्य नाही की माझं तारण व्हावं. परंतु ते विसरून जातात की प्रभू येशूने म्हटले की कारण मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधावयास व तारावयास आला आहे. एका आणखी ठिकाणी त्याने म्हटले आहे, "निरोग्यांना वैद्याची गरज नाही,तर दुखणाइतांना आहे"(मत्तय ९:१२).

यहेज्केल १८:१२-२३ मध्ये आपण बघतो की परमेश्वर म्हणतो, "तथापि दुष्टाने आपण केलेल्या सर्व पापापासून परावृत्त होऊन माझे सर्व नियम पाळिले आणि तो नितीने व धर्माने वागला तर तो खात्रीने वाचेल, मरावयाचा नाही. त्याने केलेले कोणतेही अपराध त्याच्या हिशोबी धरिले जाणार नाहीत त्याने केलेल्या धार्मिकतेमुळे तो वाचेल. प्रभू परमेश्वर म्हणतो, दुष्टाच्या मरणाने मला संतोष होतो काय? त्याने आपले मार्ग सोडून देऊन वाचावे याने मला संतोष होतो ना?" आणि (यशया १:१८,१९) मध्ये आपण असे वाचतो "परमेश्वर म्हणता चला या आपण बुद्धिवाद करू. तुमची पापे लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील, ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. तुम्ही माझे ऐकावयाला मान्य व्हाल तर भूमीचे उत्तम फळ खाल."

प्रभूसाठी कोणतेही कार्य अशक्य आहे काय? त्याला माहीत आहे की, मनुष्य स्वत: आपलं तारण करू शकत नाही. तो जाणतो की सर्व मनुष्य पापी आहेत आणि अंधारात चालत आहेत. यासाठी तो मनुष्याला वाचविण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला. तो यासाठी

आला की, अंधारात हरवलेल्यांना शोधावयास व त्यांचे तारण करावयास. जर तुम्ही स्वत:ला धार्मिक समजता तर विसरून जा की, येशू तुमच्यासाठी या पृथ्वीवर आला होता. वास्तविक तो माझ्यासारख्या पापीचे तारण करण्यासाठी आला होता. तो या पृथ्वीवर पेत्रासारख्या लोकांचे तारण करण्यासाठी आला होता. ज्याने प्रभूच्या पवित्र सावलीमध्ये उभे राहून विनंती करून म्हटले होते, "मी पापी आहे हे प्रभू मी पापी माझ्यापासून माझ्यापासून दूर जा." तो पौलासारख्या लोकांसाठी या जगात आला, ज्याने सर्वांसमोर मान्य करून म्हटले होते, "ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगात आला, हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे स्वीकारावयास योग्य आहे. त्यापापी लोकांपैकी मी मुख्य आहे" (पौलाचे तिमथ्याला पहिले पत्र १:१५). मत्तय २१:३१,३२ मध्ये आम्ही वाचतो की प्रभू येशूने त्या काळातल्या धार्मिक निरीक्षकाची गोष्ट करत म्हटले आहे. येशूने त्यास म्हटले, मी तुम्हास खचित सांगतो, जकातदार व कसबिणी तुमच्या आधी देवाच्या राज्यात जातात. (मत्तय २१:३१) ते धार्मिक निरीक्षक जे प्रभूच्या समयी राहत होते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करू शकत नव्हते का? कारण प्रभूने त्यांना सांगितले होते की, योहान तुमच्यामध्ये धर्माच्या मार्गाचा प्रचार करत आला पण तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. पण जकात घेणारे आणि व्यभिचारी यांनी विश्वास ठेवून पश्चात्ताप केला. यासाठी ते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करू शकतील.

जक्कय केवळ ठेंगणा नव्हता, परंतु त्याच्यासमोर एक अडखळणं होते की, लोकांची एक फार मोठी गर्दी येशूला घेरून होती. परंतु त्याचा इरादा पक्का होता. त्याने निश्चय केला होता की, आज तो येशूला पाहिल आणि त्याचा इरादा आम्हाला या गोष्टीवरून दिसतो की, या आधी येशू तेथून जाण्यासाठी तेथे पोहचेल. तो धावत जाऊन उंबराच्या झाडावर चढला. त्याने त्या गर्दीला पाहून आपला धीर सोडला नाही.

आज अनेक लोक प्रभू येशूजवळ येण्याचा विचार तर करतात, परंतु त्याचा निश्चय जक्कयासारखा पक्का नाही. त्यांचा निश्चय अर्धवट आहे. कदाचित ते आपल्या मनात विचार करतील की प्रभू येशूला आपला

उद्धारकर्ता मानून ते त्यांचं जीवन प्रभू येशूला देतील? परंतु नंतर त्यांना लक्ष्यात येते की, काय त्यांचे आई-बाप त्यांच्या ह्या निश्चयाला पसंत करतील? जर ते ख्रिस्ती झाले तर काय त्यांचे आई, बाप त्यांना त्यांच्या घरात स्वीकार करतील? त्यांचा समाज किंवा नातेवाईक काय म्हणतील? काय ते आपल्या समाजाकडून,मित्रांकडून स्वीकारण्यात येतील किंवा समाज आणि मित्र त्यांचा स्वीकार करतील? आणि लवकरच त्यांची हिमंत हारते. ते या सर्व कठीण परिस्थितीचा सामना करायला तयार नाहीत. त्याचं मन अशा जमिनीसारखं आहे त्यामध्ये बी पेरलेले आहे, परंतु उगवण्यापूर्वीच त्या लहानशा रोपाला झाडे दाबून टाकतात. त्यांचा निश्चय अर्धवट आहे. त्याच्यात साहस नाही आणि वास्तविक असल्याप्रकारचे लोक येशूकडे कधीच येत नाहीत. कारण प्रभू येशूने म्हटले, ''जो माझ्यापेक्षा आपल्या बापावर किंवा आईवर अधिक प्रेम करितो तो मला योग्य नाही. जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रेम करितो तो मला योग्य नाही आणि जो आपला वधस्तंभ उचलून घेऊन माझ्या मागे येत नाही तो मला योग्य नाही'' (मत्तय १०:३७,३८).

वास्तविक कोणताच मनुष्य प्रभूच्या मागे रिकाम्या हाताने कधीच चालू शकत नाही. ते सर्व जे येशू ख्रिस्ताच्या मागे चालण्याचा निश्चय करतात त्यांना आपला वधस्तंभ उचलून घेऊन त्याच्यामागे चालावे लागते आणि याचा अर्थ असा आहे की त्यांना येशूसारख्या दु:खाचा आणि कठीण प्रसंगाचा सामना करण्यास तयार राहावं लागतं. जसा येशू वधस्तंभावर बलीदान होण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता. येशूच्या मागे चालायला त्यांना जग सोडावं लागतं. एकदा जेव्हा एका मनुष्याला येशूच्या मागे येण्यासाठी बोलावले तर लूक ९:५९ मध्ये लिहिले आहे तर त्याने प्रभूला म्हटले होते, ''परंतु तो म्हणाला, प्रभूजी पहिल्याने मला माझ्या बापाला पुरावयास जाऊ द्या. तो त्याला म्हणाला, मेलेल्यांना आपल्या मेलेल्यास पुरू दे. तू जाऊन देवाच्या राज्याची घोषणा कर.'' प्रभूची इच्छा आहे की, आम्ही आमच्या जीवनात सर्वप्रथम आणि उत्तम

स्थान केवळ येशूलाच द्यावे. जर आम्हाला प्रभू येशूचे अनुसरण करायची इच्छा आहे तर आम्हाला त्याच्या मागे आपला वधस्तंभ घेऊन चालावे लागेल. परंतु त्याने आम्हाला असे कार्य करायची आज्ञा दिली नाही की, जी अशक्य आहे. कारण आपण पाहतो की, तो स्वत: सर्वात प्रथम आमच्या पुढे पुढे आपला वधस्तंभ घेऊन चालला.

म्हणून जेव्हा प्रभू येशूने जक्कयच्या हृदयाला दृढ निश्चयाने पाहिले, तर त्याने जक्कयाला म्हटले जक्कया त्वरा करून खाली ये कारण मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे. जेव्हा मनुष्याच्या हृदयात कोणते कार्य करण्याचा दृढ निश्चय असतो तर त्याला अवश्य सफलता प्राप्त होते. आमच्या देशाच्या मोठमोठ्या नेत्यांनी आपल्या दृढ निश्चयाच्या जोरावरच स्वतंत्रता प्राप्त केली होती. जेव्हा कोलंबसने धैर्य तथा निश्चयाने आपल्या यात्रेची सुरूवात केली तर त्याला यश मिळाले. प्रभू येशूच्या मागे चालायला एक दृढ निश्चयाचीच आवश्यकता असते. येशूने त्याला म्हटले, "जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागे पाहतो तो देवाच्या राज्यास उपयोगी नाही." (लूक ९:६२). परंतु त्याने प्रतिज्ञा करून म्हटले, "जो मरेपर्यंत विश्वासू राहील त्याला मी जीवनाचा मुगुट देईन" (प्रकटीकरण २:१०). आणि वास्तविक या अधिक मनुष्याला काय पाहिजे ? मत्तय १६:२४-२६ या वचनात मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्या मागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वत:चा त्याग करावा व आपला वधस्तंभ घेऊन मला अनुसरावे, कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो, तो आपल्या जीवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरिता आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळविले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जिवाबद्दल काय मोबदला देणार? कदाचित तुमच्याजवळ धन, संपत्ती असेल किंवा होऊ शकते जगाची काही अशी एखादी वस्तू असेल ज्यावर तुम्ही खूप गर्व आणि भरोसा करीत असाल. परंतु तुम्ही तुमच्या आत्म्याला वाचविण्यासाठी ती वस्तू देऊ शकता?

मित्रांनो, जगाच्या कोणत्याच वस्तूमध्ये तुमच्या आत्म्याला

वाचविण्याची शक्ती नाही. जर तुमच्याजवळ येशू नाही तर तुम्ही कंगाल व दरिद्री आहात. तुमच्याजवळ वास्तविक काही नाही. परंतु जेव्हा जक्कयने येशूला प्राप्त केले तर त्याने म्हटले हे प्रभू पहा, मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यास देतो, मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. येथे आपण दोन विशेष गोष्टी पाहतो, पहिली ही की जक्कयाने आपल्या संपत्तीचा सदुपयोग करण्याचा निर्णय केला. त्याने आपली संपत्ती गोरगरिबांमध्ये वाटण्याचा निश्चय केला. कारण त्याला येशूमध्ये सर्वात मोठी संपत्ती मिळाली होती. दुसरीकडे आपण पाहाते की, त्याने पश्चात्ताप केला. त्याने म्हटले की, मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. त्याने आपले जीवन बदलण्याचा निश्चय केला तर जेव्हा येशूने पाहिले की जक्कय आपल्या पापापासून पश्चात्ताप करत आहे तेव्हा येशूने त्याला म्हटले, ''आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे.''

जक्कय खूप आनंदीत होता. लिहिले आहे, जेव्हा येशूने त्याला म्हटले की आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे मग तो त्वरेने खाली उतरून आनंदाने त्याला घरी घेऊन गेला. तो आनंदी होता. कारण त्याला येशू भेटला होता.तुम्हीपण येशूला प्राप्त करू शकता. येशूने म्हटले '' अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणावर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जिवास विसावा मिळेल. कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे'' (मत्तय ११:२८-३०). जक्कयाविषयी लिहिले आहे तो धावत जाऊन प्रभूला भेटायला गेला. तुम्ही प्रभूच्या या आमंत्रणाचा स्वीकार करायला धावत पुढे याल काय? प्रगटीकरण ३:२० या वचनात येशूने म्हटले, ''पहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे, जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन आणि तो माझ्याबरोबर जेवील.'' जक्कय आनंदाने प्रभू येशूला आपल्या घरी घेऊन गेला. येशूला तुम्ही आज आनंदाने, प्रसन्नतेने आपल्या मनात

स्वीकार कराल? ऐका, येशू म्हणतो, पहा मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे. जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन आणि तो माझ्याबरोबर जेवील. तुम्ही ऐकत आहात काय? होय. आज जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वी जेव्हा येशू यरीहोवरून जात होता. आज जक्कयासारखे पुढे होऊन येशू तुमच्यासमोरून जात आहे. तुम्ही धावत जाऊन त्याच्यापुढे याल. त्याला सामोरे व्हाल? तुम्ही त्याला आपल्या घरी स्वीकाराल? जक्कयसारखा तुम्हाला सार्वकालीक जीवन देऊ इच्छितो.तो तुमचे तारण करू इच्छितो. येशूने म्हटले, "जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल" (मार्क १६:१६). तुम्ही त्याचा स्वीकार कराल ? त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याच्या आज्ञा पाळा. त्याने म्हटले, "माझ्यावर तुमची प्रीति असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल" (योहान १४:१५). तुम्ही त्याचे ऐकणार नाही काय? ज्याने तुम्हाला वाचविण्यासाठी स्वत:ला दिले.

• • •

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.**(Tamil&English)

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition,Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds,Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**
**"Sathya Vazhi",** Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**
**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**
**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI** **TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**For more information & Bible course write to**
Post Box 80, Kakinada, Andhrapradesh-533001.
Phone : 08842363722 E-mail : jgootam@yahoo.com

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**
T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.
Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**

**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

T.V. Program : **Shubh Sandesh Hindi Channel**
Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm
Speakers : **Sunny/ Francis/ Vinay David**
Magazine : **English Bible Teacher - Sunny David**
E-mail : sunny_davidin@yahoo.co.in
Cell : 09810896789
**Hindi Bible Teacher - Francis David,**
Email : davidfrancis53@rediffmail.com
Cell : 09911916932
Bible Courses : **Hindi & English - Vinay David**
Emai: vinay_david2002@yahoo.co.in
Cell : 09911719517
Church meets at: C.R. Park, 1st block, Near Market
No. 4, New Delhi - 110019
Sunday Worship: 11.00 a.m.

**For more information write to :**

**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
## फॉर्म

- ○ मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- ○ मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ...................... ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- ○ मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**
**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road,**
**Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ......................................................................................
Add ........................................................................................
...............................................................................................
City ........................ State ...................... Pin ...............................